दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २२९ I मंगळवार २ जून २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com



‘सहजयोग’
भाग ६९

**कुंडलिनी जागरण...** गोष्ट अशी आहे की शरीर, बुद्धी, मन, अहंकार इत्यादी ज्या उपाध्या आहेत, त्या तुम्ही नाही आहात; आणि याच कारणामुळे तुम्ही त्रस्त आहात, कारण तुम्ही त्यांनाच 'मी' समजून बसला आहात. परंतु तुम्ही शुद्ध आत्मा आहात. आधी परंपरा अशी होती की एक गुरू, एकाच शिष्याला हा आत्मसाक्षात्कार देत असे. याच महाराष्ट्रात ज्ञानेश्वर महाराजांसारखे महान संत झाले. त्यांनी आपले गुरू, जे त्यांचे मोठे बंधू होते, त्यांच्याकडे परवानगी मागितली की, तुम्ही मला ही परवानगी द्या की मी आता जी 'ज्ञानेश्वरी' लिहीत आहे, त्यामध्ये आत्मदर्शन कसे होते याबद्दल लिहू शकेन. आणि त्यांनी आपल्या सहाव्या अध्यायात अतिशय स्पष्टपणे कुंडलिनीचे वर्णन केले. तसे पाहता, कुंडलिनीचे कार्य या देशात हजारो वर्षांपासून होत आले होते, परंतु ते एका गुप्त पद्धतीने सुरू होते, जे नाथ पंथीयांनी चालवले होते. त्यांनी सहाव्या अध्यायात हे लिहिल्यानंतर, जे धर्ममार्तंड होते, त्यांना कुंडलिनीच्या जागरणाबद्दल किंवा कुंडलिनीबद्दल काहीच माहिती नव्हती, त्यामुळे त्यांनी सांगितले की ही गोष्ट निषिद्ध आहे. जेव्हा त्यांनी सांगितले की ही गोष्ट निषिद्ध आहे, तेव्हा सर्वसामान्य जनतेने विचार केला की, जी गोष्ट निषिद्ध आहे ती कशासाठी वाचावी? ती का जाणून घ्यावी? परंतु त्यानंतर सोळाव्या शतकात, याच महाराष्ट्रात अनेक साधू-संत झाले ज्यांना आपण आता विसरून गेलो आहोत त्यांनी येथे आपले रक्त सांडले (रक्ताचे पाणी केले) आणि अनेक वेळा कुंडलिनीबद्दल सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरू समर्थ रामदास स्वामी यांना जेव्हा विचारण्यात आले की, या कुंडलिनीचे जागरण किती वेळात होते? तेव्हा त्यांनी उत्तर दिले, तत्क्षण! म्हणजेच त्याच क्षणी होते; परंतु घेणारा योग्य पाहिजे आणि देणारा तसा पाहिजे.

०७ जानेवारी १९९४, पुणे www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# तब्बल १ कोटी २५ लाख लाडक्या बहिणी अपात्र ; सुप्रिया सुळेंनी दिली पोर्टलची आकडेवारी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून लाडकी बहीण योजना चांगलीच चर्चेत आहे, त्याला कारण आहे ते यंदाच्या हफ्त्यात ५० लाखांहून अधिक लाडक्या बहिणींना पैसे मिळालेच नाहीत. लाडकी बहीण योजनेतून ८० लाख महिलांना विविध कारणास्तव वगळण्यात आल्याचं समोर आलं आहे. त्यानंतर, विरोधी पक्षातील नेत्यांनी जोरदार आवाज उठवला असून हा लाडक्या बहिणींवर अन्याय असल्याचं म्हटलं आहे. निवडणुकांवेळी सरकारने पात्रतेच्या निकषाला कात्री लावली होती, मात्र आता निकष देऊन लाडक्या बहिणींनाच योजनेसाठी कात्री लावण्यात येत असल्याचं दिसून येत आहे. विशेष म्हणजे, तब्बल १.२५ कोटीहून अधिक महिलांना या योजनेतून अपात्र ठरविण्यात आल्याचं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.

सुप्रिया सुळेंनी ट्विटरवर पोस्ट करत म्हटलंय की, लाडकी बहीण योजनेअंतर्गत सुरुवातीला २.३७ कोटी महिलांना लाभ दिल्याचा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला होता. डिसेंबर २०२४ पर्यंत या महिलांना तब्बल ₹१७ हजार ५०५ कोटींपेक्षा अधिक रक्कम वितरित झाल्याची माहिती देखील देण्यात आली. पुढे या योजनेअंतर्गत लाभार्थी संख्या २.४६ ते २.४८ कोटींपर्यंत गेल्याचे सांगण्यात आले, जो या योजनेचा उच्चांक होता. त्यानंतर इ केवायसी बंधनकारक केल्यानंतर टप्प्याटप्प्याने लाभार्थी संख्या कमी होत गेली. माध्यमांमधील सध्याच्या आकडेवारीनुसार तब्बल ८० लाख महिला अपात्र ठरविण्यात आल्याचे सांगितले जात आहे आणि आता सुमारे १.६६ कोटी महिलांनाच योजनेचा लाभ मिळणार असल्याचे समोर येत आहे.




लाडकी बहीण योजनेच्या पोर्टलवरील प्रत्यक्ष आकडे पाहिले असता अर्जांची आणि मंजूर लाभार्थ्यांची संख्या आणखीच कमी दिसत आहे. पोर्टलवर एकूण अर्जांची संख्या फक्त १.१२ कोटी तर मंजूर अर्जांची संख्या फक्त १.०६ कोटी इतकीच दिसत आहे. म्हणजे डिसेंबर २०२४ मधील आकडेवारी गृहीत धरली तर तब्बल १.२५ कोटीहून अधिक महिलांना या योजनेतून अपात्र ठरविण्यात आले आहे, असे स्पष्टपणे दिसत आहे, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटलंय.

जर शासनानुसार आजही १.६६ ते १.६८ कोटी लाभार्थी असतील, तर पोर्टलवर त्यापेक्षा कमी आकडे का दिसत आहेत? सुरुवातीला जाहीर केलेले लाभार्थी नेमके कोण होते? पडताळणीदरम्यान एवढ्या मोठ्या प्रमाणावर महिलांना अपात्र का ठरवण्यात आले? या सर्व बाबींवर सरकारने स्पष्ट, सविस्तर आणि पारदर्शक भूमिका मांडणे आवश्यक आहे. जनतेच्या कष्टातून निर्माण झालेल्या कररूपी पैशांतून ही योजना चालविली जाते. त्यामुळे गेली वर्ष-दीड वर्ष सरकार अपात्र लाभार्थ्यांनाच जनतेचा पैसा वाटत होते का, असा अत्यंत गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहे. ही संपूर्ण बाब मूळात या सरकारचे घोर अपयश उघड करणारी आहे.

# मान्सूनपूर्वी राजकारणाचा मौसम

## विधान परिषदेच्या १७ लढती ठरल्या: महायुतीला महाविकास आघाडी भिडणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी अखेर आज उमेदवारी अर्ज भरण्यात आले असून महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच थेट लढत होणार आहे. मात्र, जवळपास सर्वच मतदारसंघात काही नेत्यांनी नाराजी व्यक्त करत बंडखोरी केलीय, तर काहींनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने एकाच जागेसाठी अनेक उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मात्र, प्रमुख लढत ही महायुतीचे उमेदवार विरुद्ध महाविकास आघाडीचे उमेदवार यांच्यातच होणार आहे. सोलापूर ते संभाजीनगर आणि जळगाव ते नागपूरपर्यंत एकूण १७ मतदारसंघातील उमेदवारांची नावे आता समोर आली आहेत. नाशिकचा अपवाद वगळता सर्व ठिकाणी महाविकास आघाडी महायुतीशी भिडणार आहे.

महायुतीमध्ये भाजप ११ जागांवर निवडणूक लढवत असून शिंदेंची शिवसेना ४ जागांवर मैदानात आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेसला जागावाटपात २ जागा मिळाल्या आहेत. दुसरीकडे महाविकास आघाडीचा विचार केल्यास, काँग्रेस सर्वाधिक ८ जागांवर निवडणूक लढवत आहे, ठाकरेंची शिवसेना **(पान ४ वर)**

### मतदारसंघनिहाय मुख्य लढती

१. सोलापूर : काँग्रेस मविआचे आदित्य फत्तेपूरकर विरुद्ध भाजप महायुतीचे राजेंद्र राऊत
२. अहिल्यानगर – काँग्रेस मविआचे करण ससाणे विरुद्ध भाजप महायुतीचे प्राजक्त तनपुरे
३. ठाणे : राष्ट्रवादी काँग्रेस मविआचे अभिजीत पवार विरुद्ध शिवसेना महायुतीचे रविंद्र फाटक
४. जळगाव : शिवसेना ठाकरे मविआचे शरद तायडे विरुद्ध भाजप महायुतीचे नंदकिशोर महाजन
५. सांगली-सातारा : राष्ट्रवादी काँग्रेस मविआचे बाळासाहेब पाटील/अभयसिंह जगताप विरुद्ध भाजप धैर्यशील माने




६. नांदेड : काँग्रेस मविआचे रामदास पाटील विरुद्ध भाजप महायुतीचे अमर राजूरकर
७. यवतमाळ : काँग्रेस मविआचे साहेबराव कांबळे विरुद्ध शिवसेना महायुतीचे दुष्यंत चतुर्वेदी
८. पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस **(पान ४ वर)**

### ससाणेंसाठी जगताप थांबले..?

अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात काँग्रेसने उमेदवारी देऊ केलेल्या दीप चव्हाण यांनी उमेदवारी अर्ज भरलाच नाही त्यामुळे काँग्रेसचे श्रीरामपूर येथील नगराध्यक्ष करण ससाणे यांचाच अर्ज महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून ग्राह्य धरला जाईल. ससाणे यांचा जिल्हा बँकेच्या माध्यमातून सर्व दूर संपर्क आहे. शिवाय २०१६ च्या निवडणुकीत अरुणकाका जगताप यांच्यासाठी माजी आमदार जयंत ससाणे यांनी माघार घेतली होती. करण ससाणे आता निवडणूक रिंगणात असल्याने सचिन जगताप यांनी उमेदवारी अर्ज भरला नसावा, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. दरम्यान सुरुवातीपासून उमेदवारीच्या चर्चेत असलेले श्रीगोंद्याचे दत्तात्रय पानसरे यांनी देखील उमेदवारी अर्ज भरला नाही. त्यामुळे अहिल्यानगरची निवडणूक भाजपचे प्राजक्त तनपुरे विरुद्ध ससाणे अशी सरळ लढत होणार असल्याचे आज स्पष्ट झाले.

# काष्टीमध्ये तरुणीला बुरखा घालण्यासाठी दबाव

## गजवा ए हिंद उल्लेख करीत मारहाण: समीर शेख ला अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा प्रतिनिधी :–** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथे एका २० वर्षीय तरुणीला बुरखा घालण्यास भाग पाडून मला गजवा-ए-हिंद करायचा आहे असे म्हणत धमकी दिल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. संबंधित तरुणीने नकार दिल्यानंतर तिच्यावर मारहाण करण्यात आली आहे. या प्रकाराने काष्टी गावासह श्रीगोंदा तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी समीर अब्दुल शेख याला पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की काष्टी परिसरात राहणारा समीर अब्दुल शेख याच्याशी पीडितेची ओळख होती. आरोपीला फिर्यादी ही हिंदू मागासवर्गीय समाजातील असल्याची माहिती होती.दि. १६ मे २०२६ रोजी आरोपी समीर शेख हा फिर्यादीला अहिल्यानगर येथे एका मशिदीत घेऊन गेला. तेथे त्याने तिला बुरखा घालण्यास सांगितले तसेच गळ्यात घालण्यासाठी ताईत दिला. मला गजवा-ए-हिंद करायचा आहे, असे आरोपी म्हणाला असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. फिर्यादीने यास विरोध केला असता आरोपीने मारहाण करून तू बुरखा घातला नाही तर तुला इथेच मारून टाकीन, अशी धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.यानंतर फिर्यादीने आरोपीशी संबंध तोडले. मात्र दि. १ जून २०२६ रोजी सकाळी आरोपी तिच्या घरी आला व तू माझ्याशी **(पान ४ वर)**

### महत्त्वाचे..

#### नीट परीक्षा लेखीच होणार : सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली : नीट यूजी परीक्षा २१ जून रोजी पुन्हा आयोजित केली जाणार आहे. पेन-पेपर परीक्षेऐवजी संगणक-आधारित परीक्षा घेण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. आरजेडीचे खासदार सुधाकर सिंह यांनी ही याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाने यावर्षी अशी परीक्षा घेणे अव्यवहार्य असल्याचे म्हटले होते. तथापि, याचिकाकर्त्यांच्या वारंवार केलेल्या विनंतीनंतर, न्यायालयाने सांगितले की त्यांनी नीट-संबंधित याचिकांवर जुलैमध्ये सुनावणी निश्चित केली आहे. या याचिकेवरही त्यांच्यासोबतच सुनावणी होईल. याचिकाकर्ते सुधाकर सिंह हे नीट परीक्षेसंदर्भात विविध मागण्यांसाठी न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि अरविंद कुमार यांच्या खंडपीठासमोर हजर झाले, परंतु आज त्यांनी प्रामुख्याने परीक्षा सीबीटी पद्धतीने घेण्याच्या मागणीवर जोर दिला. त्यांच्या वकिलाने न्यायालयात सांगितले.

# श्रीरामपुरात दोन तरुण शेतकऱ्यांची आत्महत्या

## उंदिरगाव, मालुंजेत कर्जबाजारीपणाला कंटाळून संपविले जीवन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर / उंदिरगाव :** कर्जबाजारी पणाला कंटाळून तालुक्यातील उंदीर गाव येथील राजेंद्र ताके या तरुणाने चिठ्ठी लिहून गळफास घेऊन आत्महत्या केली. गावातील तीन लोक शेती नावावर करून देण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकत असल्याचे त्याने शेतीत नमूद केले आहे. तर, मालुंजे येथील तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्म हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली. अशोक वाघ असे या तरुणाचे नाव असून त्यानेही कर्जबाजारीपणाला कंटाळून हत्या केल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. श्रीरामपूर सारख्या प्रगत व बागायती तालुक्या एकाच दिवशी दोन शेतकरी आत्महत्या समोर आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील उंदिरगाव व मालुंजे येथे दोन अशा घटना घडल्या आहेत.रविवारी (दि.३१) मे रोजी दुपारी सुमारास उघडकीस आली. बापू उर्फ राजेंद्र आण्णासाहेब ताके ( वय ४४, रा.उंदिरगाव ) असे मृत तरुणाचे नाव आहेत.तसेच,मालुंजे (ता.श्रीरामपूर) येथील शेतकरी अशोक वाघ (वय-३६) याने राहत्या घरी गळफास घेतल्याने त्यांची जीवनयात्रा संपली आहे.

याप्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, उंदिरगाव येथील राजेंद्र ताके यांच्यावर कर्ज होते. या कर्जाला कंटाळून गळफास लावून आत्महत्या केली. ही बाब रविवारी दुपारी कुटूंबीयांच्या लक्षात येताच एकच खळबळ उडाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेवून पाहणी केली.

यावेळी, पोलिसांना एक सुसाईनोट आढळून आली.त्यात कर्जाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचा उल्लेख केला अशी माहिती मिळत आहेत.दरम्यान पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणी करीता रुग्णालयात पाठविला.याप्रकरणी तालुका पोलिस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास संजय पवार अधिक तपास पोलिस करीत आहे.हे राजेंद्र ताके शेतकरी व हॉटेल व्यावसायिक होते.त्यांनी दुपारी चार वाजेच्या दरम्यान उंदीरगाव – माळेवाडी रोडलगत पेट्रोल पंपाशेजारी असलेल्या माई हॉटेलमधील किचनमध्ये त्याने आत्महत्या करत आपली जीवनयात्रा संपवली.

सदरचे हॉटेल तो भागीदारीमध्ये चालवत होता.स्थानिक नागरिकांनी याबाबत पोलिसांना माहिती दिली.पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करून शवविच्छेदन करण्यासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले.शेती व हॉटेल व्यवसायामुळे तो कर्जबाजारी झाला असल्याची गावात चर्चा सुरू आहेत.आत्महत्या करण्यापूर्वी त्याने चिठ्ठी लिहून ठेवली होती.यात नामे ढोबळे,पंडित गायकवाड असे नामक व्यक्तीचे चिठ्ठीत नावे अशी माहिती पोलीस **(पान ४ वर)**

# लोखंडी हॉर्डिंग अंगावर पडल्याने तरुण ठार, सदोष मनुष्यवधाचा गन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** फलक चिकटवणाऱ्या ठेकेदाराने मजुरास कोणतेही सुरक्षिततेची साधन प्रदान न करता वादळी वाऱ्याच्या पावसात फलकास छिद्र पाड असे म्हणत कामावर गेलेल्या मजुराचा लोखंडी होर्डिंग अंगावर पडत दुर्दैवी मृत्यू झाला. राशीन (ता.कर्जत) येथील अमीत मोहन सुकाळे असे मयत तरुणाचे नाव आहे . याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात संबंधित ठेकेदार याच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला.



पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रविवार, दि ३१ रोजी संध्याकाळी राशीन येथे वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. यावेळी राशीन येथील महात्मा फुले चौकात एक शुभेच्छा पर फलक असून या वादळी वाऱ्यात त्याचे नुकसान होऊ शकते म्हणून विकास लहु सायकर (राशिन ता. कर्जत) **(पान ४ वर)**

# सासरच्या जाचाला कंटाळून जावयाची आत्महत्या!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** तालुक्यातील खरवंडी परिसरातील एका तरुणाच्या मृत्यूप्रकरणी त्याच्या वडिलांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मुलाच्या सासरच्या मंडळींकडून होत असलेल्या कथित मानसिक त्रास, धमक्या आणि कौटुंबिक वादामुळे हा प्रकार घडल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. धोंड्याच्या महिन्यात जावयाने आत्महत्या केल्याने परिसरात चर्चेला उधान आले आहे.

**सासरच्या मंडळींच्या विरोधात गुन्हा दाखल करावा: वडीलांची मागणी**

तक्रारीनुसार, मृत तरुणाचा विवाह काही वर्षांपूर्वी जिल्ह्यातील मिरजगाव येथे झाला होता. विवाहानंतर पती-पत्नीमध्ये तसेच दोन्ही कुटुंबांमध्ये वेळोवेळी वाद निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. संबंधित तरुणाने आपल्या वडिलांकडे सासरच्या व्यक्तींकडून मानसिक त्रास दिला जात असल्याची अनेकदा व्यथा मांडल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.तक्रारीत असेही म्हटले आहे की, काही दिवसांपूर्वी संबंधित तरुणाची पत्नी गरोदर असल्याने उपचारासाठी माहेरी गेली होती. त्यानंतर दोन्ही कुटुंबांमध्ये वाद वाढले. याच पार्श्वभूमीवर तरुणाला मानसिक तणावाचा सामना करावा लागत असल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. दरम्यान, ३० मे रोजी **(पान ४ वर)**

# कॉकरोच जनता पार्टीचे पहिले शक्ती प्रदर्शन दिल्लीत

## अभिजीत दिपके भारतात येणार : शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी ६ जूनला जंतर-मंतरवर आंदोलन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** कॉकरोच जनता पार्टीचा संस्थापक अभिजीत दीपके ६ जून रोजी भारतात परतणार आहेत. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतर मंतर आंदोलन करणार आहे. अभिजितने 'एक्स' अकाउंटवर 'कॉकरोच इज बॅक' ही माहिती दिली. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अलीकडील 'कॉकरोच' (झुरळ) वक्तव्यानंतर 'कॉकरोच जनता पार्टी' हे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म उदयास आले. सीजेपीचे इन्स्टाग्रामवर २० दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स आहेत. दिल्लीतील सहा जून रोजी होणारे आंदोलन सीजीपीचे पहिले शक्ती प्रदर्शन ठरेल.

३० वर्षीय अभिजीत दीपके छत्रपती संभाजी नगरमधील असून डिजिटल मीडिया स्ट्रॅटेजिस्ट आहे. वृत्तानुसार, अभिजीतने पुण्यात पत्रकारितेचे शिक्षण घेतले असून सध्या तो अमेरिकेतील बोस्टन युनिव्हर्सिटीमध्ये पब्लिक रिलेशन्समध्ये पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेत आहे. अभिजीतने २०२० ते २०२२ या काळात केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीसाठी सोशल मीडिया स्ट्रॅटेजिस्ट म्हणून काम केले.

प्रवेश मिळाल्यानंतर तो अमेरिकेत स्थायिक झाला. अभिजीत आपल्या 'एक्स' अकाउंटवरून शेतकऱ्यांच्या आंदोलनापासून ते महागाईपर्यंतच्या राजकीय मुद्द्यांवरून केंद्र सरकार आणि पंतप्रधानांना लक्ष्य करत आहे.



**२०२० च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीदरम्यान, अभिजीतने 'आप'साठी व्हायरल मीम-आधारित ऑनलाइन प्रचार साहित्य तयार केले होते. एका मुलाखतीत अभिजीतने खुलासा केला की, त्याने वैयक्तिक आयुष्य आणि आर्थिक स्थैर्यासाठी 'आप' सोडले आणि बोस्टन युनिव्हर्सिटीमध्ये अर्ज केला.**

# नीट पेपरफुटीचा मास्टर माईंड कुलकर्णीच्या इमारतीवर पालिकेचा हातोडा!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बीड :** नीट पेपरफुटीचा मास्टरमाईंड असलेल्या बीडमधील पी.व्ही. कुलकर्णी याच्यावर बीड नगरपालिका प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. बीड शहरातील शाहू नगर भागात सुरू असलेल्या त्याच्या बांधकामावर अखेर हातोडा मारण्यात आला असून सदर अवैध बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले.

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटीप्रकरणात सीबीआयने कारवाईचा धडाका लावत महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, लातूर, बीडमधून अनेकांना अटक केली आहे. याप्रकरणी, सीबीआयकडून आरोपींची कसून चौकशी सुरू असून काही आरोपींना आता न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहेत.

बीडश्रनगरपालिका प्रशासनाने सदरील बांधकाम संबंधित ठेकेदाराने स्वतः पाडून घ्यावे याकरिता



नोटीस बजावली होती. मात्र, प्रसासनाच्या या नोटीसीचा आज अल्टिमेटम संपला आहे, त्यामुळे या सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामावर हातोडा चालवला. विशेष म्हणजे स्वतः संबंधित ठेकेदाराकडून अनधिकृत असलेले बांधकाम पाडले जात आहे. देशभरात गाजत असलेल्या आणि देशभरातून संताप व्यक्त होत असलेल्या, २२ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याचा खेळ करणाऱ्या नीट पेपर फुटीच्या घोटाळ्यात सेवानिवृत्त **(पान ४ वर)**

# ‘कमळ फुलतेय की आयातीत रोपे वाढतायत?’




महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकीने पुन्हा एकदा महायुतीतील अंतर्गत विसंवाद, भाजपचे वाढते वर्चस्व आणि पक्षांतरितांवरील अवलंबित्व हा चर्चेचा विषय ऐरणीवर आणला आहे. निवडणुकीच्या निमित्ताने उमेदवारी वाटप झाले आणि त्यानंतर उफाळून आलेली बंडखोरी ही केवळ काही नाराज इच्छुकांची प्रतिक्रिया नाही, तर राज्यातील सत्ताधारी राजकारणाच्या बदलत्या स्वरूपाचे लक्षण आहे.

१७ जागांच्या निवडणुकीत भाजपने तब्बल ११ जागा स्वतःकडे ठेवून शिवसेना शिंदे गटाला चार आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाला केवळ दोन जागा दिल्या. महायुतीत भाजप हा मोठा पक्ष आहे, हे वास्तव कोणी नाकारू शकत नाही. मात्र मित्रपक्षांना दिलेली वागणूक पाहता ही युती समानतेची नसून अधिपत्याची असल्याची भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे. छत्रपती संभाजीनगरसारख्या जागेसाठी एकनाथ शिंदे आग्रही असतानाही भाजपने ती सोडण्यास नकार दिला. रायगड–रत्नागिरी–सिंधुदुर्गमध्ये शिवसेनेचा दावा डावलण्यात आला. पुण्यात राष्ट्रवादीला शेवटपर्यंत ताटकळत ठेवण्यात आले. या सगळ्या घटनांनी महायुतीतील शक्तिसंतुलन नेमके कुणाच्या बाजूने झुकले आहे, याचे उत्तर स्पष्ट होते.

परंतु या निवडणुकीतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा वेगळाच आहे. भाजपने स्वतःसाठी राखून ठेवलेल्या ११ जागांपैकी पाच उमेदवार हे इतर पक्षांतून आलेले आहेत. कुणी काँग्रेसमधून, कुणी राष्ट्रवादीतून तर कुणी शिवसेनेतून भाजपमध्ये दाखल झालेले आहेत. निवडणुकीच्या तोंडावर विरोधी पक्षातील नेत्यांना सामावून घेणे आणि त्यांना थेट उमेदवारी देणे, ही आता भाजपची नेहमीची राजकीय रणनीती बनली आहे.

राजकीय भाषेत याला “ऑपरेशन लोटस“ म्हटले जाते. विरोधी पक्षातील प्रभावशाली चेहरे आपल्या गोटात आणून त्यांची ताकद वापरणे, हा निव्वळ निवडणूक जिंकण्याचा मार्ग असू शकतो. परंतु प्रत्येक यशस्वी आयातीमागे पक्षातील एखाद्या निष्ठावंत कार्यकर्त्याचे स्वप्न मोडत असते, याचे भान नेतृत्वाने ठेवणे आवश्यक आहे.

भाजप आज राज्यात आणि केंद्रात सत्तेत आहे. संघटनात्मकदृष्ट्या तो सर्वांत मजबूत पक्ष मानला जातो. बूथपासून दिल्लीपर्यंत त्याची भक्कम यंत्रणा असल्याचा दावा केला जातो. मग प्रश्न असा निर्माण होतो की, एवढा मोठा पक्ष असताना उमेदवारांसाठी त्याला वारंवार इतर पक्षांकडे का पाहावे लागते? भाजपमध्ये सक्षम, अनुभवी आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांची कमतरता आहे का? की नेतृत्वाचा स्वतःच्या कार्यकर्त्यांवरील विश्वास उडाला आहे?

हा प्रश्न केवळ विरोधक विचारत नाहीत, तर भाजपचा सामान्य कार्यकर्ताही आता कुजबुजत आहे. अनेक वर्षे पक्षासाठी झटणारा कार्यकर्ता निवडणुकीच्या वेळी बाजूला पडतो आणि कालपर्यंत विरोधी पक्षात असलेला नेता तिकीट घेऊन पुढे जातो. अशा वेळी कार्यकर्त्यांच्या मनात असंतोष निर्माण होणे साहजिक आहे. निष्ठेचे मूल्य जर सतत कमी होत गेले, तर संघटनेचा आत्माच कमकुवत होतो.

स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील उमेदवारीवरून झालेली बंडखोरी ही याच नाराजीची अभिव्यक्ती मानावी लागेल. अब्दुल सत्तार यांच्या मुलाची बंडखोरी असो किंवा रायगडमध्ये निर्माण झालेला संघर्ष, ही केवळ वैयक्तिक महत्त्वाकांक्षेची प्रकरणे नाहीत. या घटनांमागे उमेदवारीच्या प्रक्रियेविषयीचा असंतोष आणि पक्षातील स्थानिक नेतृत्वाला डावलल्याची भावना आहे.

यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे भाजपने मित्रपक्षांच्या जागा कमी करून स्वतःच्या जागा वाढवल्या; पण त्या जागांवरही मोठ्या प्रमाणात आयात नेत्यांनाच संधी दिली. मग मूळ भाजप कार्यकर्त्यांच्या वाट्याला नेमके काय आले? जागा वाढल्या पक्षाच्या, पण संधी वाढल्या कोणाच्या? हा प्रश्न टाळता येणार नाही.

राजकारणात विजय महत्त्वाचा असतो, हे खरे. परंतु केवळ जिंकण्यासाठीच पक्ष उभे राहत नाहीत. विचारधारा, निष्ठा, संघटन आणि कार्यकर्त्यांचे योगदान यांवर पक्षांची खरी ओळख उभी असते. जर पक्षाची वाढ सतत आयातीवरच अवलंबून राहिली, तर एक दिवस अशी वेळ येऊ शकते की पक्षाचा मूळ चेहराच ओळखू येणार नाही.

विरोधक अनेकदा आरोप करतात की, भाजपची ताकद ही स्वतःच्या नेतृत्वापेक्षा इतर पक्षांतून आलेल्या नेत्यांवर उभी आहे. हा आरोप अतिशयोक्त वाटू शकतो; पण भाजपनेच जर वारंवार आयात उमेदवारांवर भर दिला, तर त्या आरोपांना बळ मिळते. आज राज्यातील भाजपमधून बाहेरच्या विचारधारेतून आलेली मंडळी बाजूला केली, तर पक्षाची संघटनात्मक ताकद किती उरते, हा प्रश्न विरोधक विचारतात. त्याचे उत्तर भाजपने आपल्या कृतीतून द्यायला हवे.

महायुतीतील मित्रपक्षांना दुय्यम स्थान देणे, स्थानिक नेतृत्वाला डावलणे आणि आयात उमेदवारांवर अवलंबून राहणे ही अल्पकालीन निवडणूक रणनीती असू शकते. पण दीर्घकालीन राजकारणात ती धोकादायक ठरू शकते. कारण पक्षांची खरी ताकद सत्तेत नसते; ती कार्यकर्त्यांच्या मनात असते. स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकीने भाजपला विजयाचा मार्ग दाखवला असेल; पण त्याचबरोबर एक आरसाही दाखवला आहे. त्या आरशात दिसणारी वाढती ताकद ही खरंच कमळाची आहे की आयातीत रोपांची, याचा विचार आता भाजप नेतृत्वानेच करायचा आहे. कारण कार्यकर्त्यांच्या मनातील नाराजीचे बीज एकदा रुजले, तर त्याची फळे निवडणुकीच्या निकालात दिसायला वेळ लागत नाही.

# स्व.बाळासाहेबांचे दुष्काळ मुक्तीचे स्वप्न ना. विखेंनी पूर्ण करावे : अण्णासाहेब हजारे

## ना. विखे यांनी घेतली हजारेंची सदिच्छा भेट



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहील्यानगर** : स्व.बाळासाहेब विखे यांनी पाहिलेले महाराष्ट्र दुष्काळमुक्तीचे स्वप्न त्यांचे सुपुत्र व राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पा. यांच्या कारकिर्दीत पुर्ण व्हावे,“ अशी अपेक्षा ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांनी व्यक्त केली.

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे यांनी आज राळेगणसिद्धी येथे जाऊन पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी झालेल्या अनौपचारिक चर्चेत हजारे यांनी ही अपेक्षा व्यक्त केली. ना. विखे यांनी राळेगणसिद्धी येथे जाऊन पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी ना . विखे यांच्यासमवेत भारतीय जनता पक्षाचे जिल्हा समन्वयक विनायक देशमुख होते.यावेळी मंत्री ना. राधाकृष्ण विखे यांनी जलसंपदा विभागाच्या माध्यमातून सूरू असलेल्या कामाची तसेच राज्य दुष्काळ मुक्त करण्याच्या दृष्टीने हाती घेण्यात आलेल्या विविध योजनांची आणि उपक्रमांची माहिती हजारे यांना दिली.प्राधान्याने शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून निर्णयांना प्राधान्य देण्यात येत असल्याने प्रामुख्याने कृष्णा व गोदावरी खोरे विकास महामंडळाच्या अखत्यारितील अनेक नवीन प्रकल्प सुरू करण्यात येत असून, धरणातील गाळ काढण्याचे धोरणही राज्य सरकारने घेतले आहे.यामध्ये अहील्यानगर जिल्ह्यातील मुळा धरणाचा समावेश केला असल्याचे ना. विखे यांनी सांगितले.जलसंपदा विभागाने राज्यातील नदीजोड प्रकल्पाच्या कामांना विशेष प्राधान्य दिले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पाच्या कार्यवाहीचे काम गतीने पुढे जात असल्याबद्दल समाधान व्यक्त करून हजारे म्हणाले, “ स्व. खा.बाळासाहेब विखे यांनी महाराष्ट्र दुष्काळ मुक्त करण्याची संकल्पना अनेक वर्षापूर्वी मांडली होती. या संदर्भात त्यांनी तज्ञांच्या मदतीने महत्वपूर्ण आराखडा देखील तयार केला होता. प्रामुख्याने कोकणातील पाणी घाटमाथ्यावर आणण्याच्या संदर्भात आणि नदीजोड प्रकल्पाबाबत त्यांच्या मनामध्ये नावीन्यपूर्ण कल्पना होत्या. या कल्पना प्रत्यक्षात आणून आता मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्व. विखे यांचे स्वप्न साकार करावे,“ अशी अपेक्षा हजारे यांनी व्यक्त केली.

# कल्याण धस एमबीबीएस परिक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : नुकत्याच झालेल्या एम बी बी एस परिक्षेमध्ये कल्याण धस याने यश संपादन केले असून, त्याने कानोजी नारायणराव युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस, वारंगल, येथून प्रथम श्रेणीत येऊन उत्तीर्ण झाला.

कल्याण याने एम.डी ऑर्थो करण्याचा मानस असून, कल्याण धस हा शहरातील प्रथितयश डॉ. विशाल धस व प्रसिद्ध ज्योतिष्य भास्कर पंडित रेणुका धस यांचे सुपुत्र व डॉ. बाबुराव धस यांचे नातू असून, या प्रकारे धस परिवाराची तिसरी पिढी आता वैद्यकीय क्षेत्रात पदार्पण करीत आहेत.या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतूक होत असून मान्यवरांकडून शुभेच्छा दिल्या आहेत.रुग्णांची ५० वर्षे सेवा करणारे डॉ. बाबुराव धस आजोबा यांची“ रुग्ण सेवा हीच ईश्वरसेवा“ ही शिकवण यापुढेही अत्यंत जबाबदारीने चालविणार असल्याचा मानस डॉ. कल्याण धस याने व्यक्त केला.



## कडीत खुर्द येथे पुरुषोत्तम अधिक मास निमित्त अखंड हरिनाम सप्ताह

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील कडीत खुर्द येथे पवित्र पुरुषोत्तम अधिक मासानिमित्ताने (दि.५) जून ते १२ जून या कालवधीत

अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहेत.या सप्ताह काळात दररोज पहाटे काकडा भजन सकाळी ९ ते १० या वेळेत संगीत भजन तसेच सकाळी १० ते १२ या वेळेत बालकिर्तनकारांची किर्तन सेवा होणार आहेत.त्याबरोबर दुपारी २ ते ४ या वेळेत पंचक्रोशीतील गुणीजन भजनी मंडळाची भजनसेवा सायंकाळी ५ ते ६.३० या वेळेत परिसरातील नामवंत वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी आणि पंचक्रोशीतील भजनी मंडळ यांचा सामुदायिक हरीपाठ संध्याकाळी ७ ते ९ या वेळेत महाराष्ट्रातील दिग्गज गायनाचार्य आणि मृदुंगाचार्य यांच्या उपस्थितीत नामवंत किर्तनकारांची किर्तनसेवा तर, किर्तनानंतर उपस्थितीसाठी महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. तसेच शुक्रवारी ( दि.१२ ) रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.राजेंद्र महाराज चितळकर यांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता होणार आहेत. किर्तनसेवेनंतर पंचक्रोशीतील उपस्थित भजनी मंडळाचा सन्मान होऊन दानशूर अन्नदात्यांचे वतीने काल्याच्या महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल.तरी,पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी भजनी मंडळांनी आणि माता भगिनींनी जास्तीत जास्त संख्येने या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे ह.भ.प. राजेंद्र चितळकर व शंकर मारुती चितळकर यांच्या संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आलेले आहेत.

# मिल्लत नगर,रामनगर मध्ये विजेचा प्रश्न गंभीर सततच्या कमी दाबामुळे नागरिक बेजार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील मिल्लत नगर,रामनगर व फातेमा कॉलनी या परिसरातील नागरिक विजेच्या सततच्या कमी दाबामुळे (लो होल्टेज) बेजार झाले असून गेल्या काही वर्षापासून सतत असणारा हा त्रास अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांच्या संयमाची सुद्धा आता परिसिमा गाठली गेली आहे. तालुक्याचे लोकप्रतिनिधी तसेच महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करूनही हा प्रश्न मार्गी लागत नसल्याने या भागातील नागरिकांमध्ये मोठी नाराजी व्यक्त केली जात आहे. या संपूर्ण परिसरामध्ये अलीकडच्या काळामध्ये लोक वस्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे त्या तुलनेने या भागातील विजेच्या डीपी संख्या कमी आहे तसेच ज्या डीपी आहेत त्यांची क्षमता देखील कमी असल्याने होल्टेज मिळत नाही.परिणामी विजेची उपकरणे वारंवार खराब होत आहेत.अनेक घरांमधून फॅन चालत नाहीत पाणी आल्यावर विजेची मोटर चालत नाही त्यामुळे पाणी देखील भरता येत नाही. विजेचा दबाव सतत कमी जास्त होत असल्याने अनेक घरांमधून फ्रीज,फॅन,इंडेक्शन तसेच इतर विजेवर चालणे उपकरणे वारंवार निकामी होत आहेत.याबाबत या भागातील नागरिकांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या अनेक वेळा भेटी घेतल्या परंतु या भागामध्ये नवीन डीपी बसविणे आवश्यक असल्याचे सांगून डीपी मंजूर नाही त्यामुळे बसवता येत नाही असे उत्तर दिले जाते. आमदार हेमंत ओगले यांच्याकडे देखील नागरिकांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे परंतु डीपीडीसीचा निधी नसल्याने महावितरण निधी शिवाय डीपी बसवित नसल्याने डीपी बसवता येत नाही असे उत्तर त्यांच्याकडूनही मिळते. शासनाकडून डीपीला निधी मिळाल्यानंतर या भागातील डीपींची क्षमता वाढवून १०० ऐवजी २०० क्षमतेचे डीपी बसवले जातील असे आश्वासन त्यांनी दिले आहे . गेली दोन वर्षे या संपूर्ण परिसरामध्ये विजेचा प्रश्न गंभीर आहे .सातत्याने नवीन वाढणारी लोक वस्ती आणि यामुळे वाढणारा विजेचा वापर त्यामुळे विजेचा प्रश्न गंभीर झाला आहे.अनेक वेळा आणि सकाळी पाणी सुटण्याच्या वेळीच वीज जाण्याचे प्रमाण देखील वाढले आहे.महावितरणचे अधिकारी याबाबत फारसे गंभीर नसल्याने हा प्रश्न रेंगाळला आहे. त्यामुळे रामनगर मिल्लत नगर फातिमा कॉलनी या भागातील विजेचे सर्व ट्रांसफार्मर हे जादा क्षमतेचे टाकण्यात यावे पातेमा कॉलनी व मिल्लत नगर भागामध्ये २०० क्षमतेचे ट्रांसफार्मर बसविण्यात यावे तसेच इतर ठिकाणी शंभर क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर तातडीने बसवावे अशी मागणी या भागातील सर्वश्री सलीमखान पठाण,नजीरभाई शेख,रजा शकुर शेख,तन्वीर शेख,खालील मोमीन,सज्जाद हुसेन,निलेश थोरात,शकील बागवान,अबुजर सय्यद,शेरखान वेल्डर,फिरोज पठाण,सलीम पटेल,लतीफ पटेल,समीरखान पठाण,डॉ.सलीम शेख,आसिफ काकर,शाहरुख काकर,कामरान पठाण,हबीब तांबोळी,रफिक भाई मेजर,इमाम सय्यद,एडवोकेट मोहसीन शेख,रमजान टेलर,याकुब शाह, कलीम शेख,आरिफ पटेल,बबलू पठाण यांच्यासह या भागातील सर्वच नागरिकांनी



केली आहे.त्या महिन्याभरामध्ये हा प्रश्न मार्गी न लागल्यास महावितरण विरोधात मोठे जन आंदोलन उभारण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे.

# ऑपरेशन मुस्कान अंतर्गत १११ अल्पवयीन मुलीचा ४ दिवसात शोध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला कोणतरी अज्ञात इसमानेपळवून नेल्याची तक्रार राहुरी पोलिसात देण्यात आली होती. त्यांच्या फिर्यादीनुसार राहुरी पोलिसात गुन्हा रजिस्टर नंबर ५९९/२०२६ बी एन एस कलम १३७(२) प्रमाणे दिनांक २७ मे २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील अपहरण झालेल्या मुलीबाबत राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना गोपनीय माहिती मिळाली असता त्या मुलीचा तांत्रिक व भौतिक पुराव्याच्या आधारे राहुरीच्या पोलीस पथकाने शोध घेतला असता सदर मुलगी माहिती मिळालेल्या ठिकाणी सापडली आहे. त्यानंतर राहुरी पोलीस पथकाने त्या अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीला राहुरी पोलीस स्टेशन येथे आणून तिची सविस्तर विचारपूस करून तिला पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक सो मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, तसेच पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक समाधान फडोळ, पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र कांबळे, पोलीस नाईक कुदळे,चालक पोलीस कॉन्स्टेबल पठाण,होम पवार यांनी केला असून तापसासाठी तांत्रिक मदत मोबाइल सेल श्रीरामपूर येथील पो.हवा.दरेकर, पो. हवा.धनाड यांनी केलेली आहे.

राहुरी चा पदभार स्वीकारल्यानंतर अडीच वर्षाचा कारकिर्दीत पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी दिगंबर अनेक अल्पवयीन मुलींच्या कुटुंबांना दिलासा दिला असून ऑपरेशन मुस्कान अंतर्गत सुमारे १११ मुलींचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या नातेवाईकांच्या सुखरूप ताब्यात दिलेले आहे. त्यामुळे अल्पवयीन मुलींचा विषय हा कौटुंबिक जिव्हाळ्याचा प्रश्न असतो त्यामुळे अनेक कुटुंबीयांना पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या कामगिरीवर सर्वसामान्य जनतेत समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# श्री काळभैरवनाथचरणी पोलीस अधीक्षक गिल्ल नतमस्तक, देवस्थानकडून सन्मान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा** : –पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी जुन्नर तालुक्यातील ओतूर व आळेफाटा पोलीस ठाण्याच्या वार्षिक तपासणी दौऱ्यात वेळ काढून खामुंडी येथील जागृत देवस्थान श्री काळभैरवनाथाचे मनोभावे दर्शन घेतले.

अत्यंत धावपळीच्या कार्यक्रमातूनही त्यांनी भक्तिभावाने दर्शन घेतल्याने गावकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. दर्शनानंतर देवस्थानच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील, ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे, सामाजिक कार्यकर्ते कैलास बोडके, सरपंच सत्यवान डुंबरे, पोलीस पाटील किरण भोर, राहुल हांडे, विलास बटवाल, संकेत जोरी, भास्कर शिंगोटे, राजेंद्र वारुळे, अरुण बोडके, नवनाथ शिंगोटे, व्यवस्थापक बबन डुंबरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उंदीरगावात पिण्याच्या व वापराच्या पाण्याची तीव्र टंचाई; ग्रामस्थ हैराण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**उंदीरगाव** : उंदीरगाव येथे सध्या पिण्याच्या तसेच दैनंदिन वापराच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक भागांमध्ये नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, पण्याच्या पाण्यासाठी तसेच अंघोळ, स्वच्छता आणि इतर घरगुती कामांसाठी लागणाऱ्या पाण्याची गंभीर कमतरता भासत आहे. महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना पाण्यासाठी वारंवार भटकंती करावी लागत असून अनेक कुटुंबे टँकरच्या पाण्यावर अवलंबून आहेत.वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक व संबंधित कर्मचाऱ्यांनी या गंभीर प्रश्नाकडे पुरेसे लक्ष दिले नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे परिस्थिती आणखी बिकट झाली असून तातडीने अतिरिक्त पाणीपुरवठा, टँकर व्यवस्था आणि दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. प्रशासनाने त्वरित हस्तक्षेप करून उंदीरगावातील पाणीप्रश्न सोडवावा, अन्यथा ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# स्व.शिवाजीराव कर्डिले यांच्या जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्याचा स्तुत्य उपक्रम श्री तुळजाभवानी सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या जयंतीनिमित्त तांदुळवाडी येथे आयोजित करण्यात आला.

ग्रामपंचायत सदस्या सौ. स्वाती विनीत धसाळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सन्मानपत्र प्रदान करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बाळासाहेब पेरणे होते. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा केवळ त्यांच्या यशाचा गौरव नसून इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचा स्रोत ठरतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती, आत्मविश्वास आणि शैक्षणिक प्रगतीची जिद्द निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

राहुरी तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक सर्जेराव पेरणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, कोणतेही यश सहजासहजी मिळत नाही. सातत्यपूर्ण परिश्रम, चिकाटी, वेळेचे योग्य नियोजन आणि अभ्यासातील एकाग्रता यांच्या बळावर विद्यार्थी आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकतात. श्री तुळजाभवानी सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून सौ. स्वाती धसाळ यांनी राबविलेला विद्यार्थी गौरव उपक्रम समाजासाठी दिशादर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकार विनीत धसाळ यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी समाजहिताची जपलेली परंपरा आणि सर्वसामान्यांच्या विकासासाठीचे विचार पुढे नेण्याचा प्रयत्न प्रतिष्ठानच्या माध्यमातून केला जात आहे. शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि युवा पिढीला प्रोत्साहन देणारे विविध उपक्रम यापुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी ज्येष्ठ भास्कर काशिनाथ पेरणे, सेवा संस्थेचे माजी चेअरमन बाळासाहेब चिमाजी धसाळ, हभप भगवान महाराज मोरे,




हभप महेश महाराज खाटेकर, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी खडके, ज्येष्ठ तुकाराम हंडाळ, विकास कुलकर्णी, माजी सैनिक भैय्यासाहेब आढाव, संतोष पवार, किरण गायकवाड, सेवा संस्थेचे सदस्य अविनाश पेरणे, योगेश पेरणे, प्रमोद खडके, लालखान शेख, रेवन्नाथ धसाळ, भाऊसाहेब गंगाधर पेरणे, कासिम शेख, नितीन मकासरे, रावसाहेब खडके, दिलीप पेरणे, संतोष धसाळ, बबन डुक्रे, मच्छिंद्र लोखंडे, भाऊसाहेब धागुडे, मुर्तुजा शेख, भगवान पेरणे, रमेश वराळे, संजय बर्डे यांच्यासह विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री तुळजाभवानी सामाजिक प्रतिष्ठानच्या अध्यक्षा तथा ग्रामपंचायत सदस्या सौ. स्वाती विनीत धसाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट देडगाव शाखेत अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



**बालाजी देडगाव** : श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट नागेबाबा उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष कडूभाऊ काळे यांच्या मार्गदर्शनातून देडगाव शाखेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली यावेळी युवा नेते निलेश कोकरे, भाजपचे आकाश चेडे, चांगदेव टकले, ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके, ज्ञानदेव भिसे, शैलेश बनसोडे, लक्ष्मण मुंगसे, राजेंद्र गोयकर, संभाजी टकले, आप्पासाहेब कोकरे, दादासाहेब कोकरे, गोरख देवकाते, संदीप गोयकर, नामदेव टकले, कुणाल शिंदे, महेश मुंगसे, सचिन गोयकर सभासद व खातेदार, कॅशियर योगेश भारती, क्लर्क अक्षय तिडके, राहुल मुंगसे, राजू वाघ व शाखाधिकारी पांडुरंग एडके आदी उपस्थित होते.

## मांजरी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**राहुरी** : तालुक्यातील मांजरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यावेळी येथे भव्य मिरवणूक काढण्यात आली. अहिल्यादेवी स्मारकापासून निघालेली मिरवणूक येथील ग्रामदैवत श्री चंद्रगिरी महाराज मंदिर येथे सांगता झाली यावेळ डिजे आणि विविध वाद्यांचा सुरात ही मिरवणूक काढण्यात आली. यावेळी या मिरवणुकीचे घराघरातील सुवासिनींनी घरासमोर सडा रांगोळी काढून स्वागत केले. या मिरवणुकीत गावातील घराघरातील महिला, मुली तरुण, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात अहिल्यादेवीच्या पुतळ्यास पुष्पहार घालून त्यांच्या आरतीने पूजन करण्यात आले यामध्ये काही प्रमुख कार्यकर्त्यांनी अहिल्यादेवींच्या कर्तुत्वावर गौरव पर भाषणे करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला. त्यांच्या सामाजिक धार्मिक आणि अध्यात्मिक कार्याला आपल्या विचारातून व्यक्त करून त्यांच्या विचाराची समाजाला गरज असल्याचे त्यांनी सांगितले. सामाजिक आणि राजकीय सत्ताकेंद्रात त्यांनी मुघल, इंग्रज तसेच पेशवे राघोबा यांचा मुसूद्देगिरीचा किस्सा वक्त्यांनी विषद केला. त्यामुळे उपस्थित मान्यवर ग्रामस्थ यांना यावेळी टाळ्यांच्या गजरात त्यांच्या विचारांना दाद दिली.

## प्रवरेच्या कृषि शास्त्र संस्थेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कृषि शास्त्र



संस्थेत संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे, कृषि संचालक डॉ.उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१वी जयंती साजरी करण्यात आली.यावेळी कृषी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.अमोल खडके, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रा. स्वरांजली गाढे, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संतोष वर्पे तसेच सर्व विद्यार्थी व कर्मचारी देखील उपस्थित होते. यावेळी डॉ.रमेश जाधव यांनी उपस्थितांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याविषयी माहिती दिली.

## शेतरस्ता अडविल्याने म्हाळस पिंपळगाव येथील चौघांवर गुन्हा

**नेवासा** : अडविलेला वहिवाटीचा शेत रस्ता तहसीलदारांच्या आदेशाने खुला केल्यानंतर काहींनी तो पुन्हा अडथळे आणून बंद केला. त्यावर तहसीलदारांच्या आदेशानुसार नेवासा तालुक्यातील म्हाळस पिंपळगाव येथील कर्डिले कुटुंबातील चौघांजणांवर शिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेवासा तालुक्यातील रस्तापूर येथील शेतकरी बापूसाहेब रामकिसन सावंत व इतरांना नेवासा तहसीलदार यांनी दिलेल्या पत्रावरून शिंगणापूर पोलिसांनी अंकुश रामदास कर्डिले, देविदास रामदास कर्डिले, गौरव अंकुश कर्डीले,तुषार देविदास कर्डिले सर्व रा.म्हाळस पिंपळगाव, ता.नेवासा यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बापूसाहेब सावंत यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की रस्तापूर येथील गट नंबर ४१२ मधील बांधाच्या कडेने मला धुमाळ यांना शेतात जाणे येण्यासाठी मंडळ अधिकारी व तलाठी यांनी रस्ता मोजून खुला करून दिला.

परंतु ज्याच्या शेतातून हा रस्ता जातो त्या अंकुश रामदास कर्डिले, देविदास रामदास कर्डिले, गौरव अंकुश कर्डीले,तुषार देविदास कर्डिले सर्व रा.म्हाळस पिंपळगाव ता.नेवासा यांनी तहसीलदारांच्या आदेशाने खुल्या केलेला रस्त्यात दोन-तीन ठिकाणी खड्डे खोदून नुकसान केले व शेतात ये - जा करण्यासाठी अडथळा निर्माण केला. यावरून तहसीलदारांच्या आदेशाचे अवमान व उल्लंघन केले म्हणून कर्डीले यांचेवर शिंगणापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता २०२३ चे कलम २२३, ३२९(२) व ३२९(१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिंगणापूर पोलिसांनी घटनास्थळाचा दि. २९ रोजी पंचनामा केलेला आहे. दरम्यान शिव पाणंद शेत रस्ते चळवळीच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की,असे शेत रस्ते अडविणाऱ्यांवर २५ मार्च २०२६ रोजी शासनाने काढलेल्या शासन आदेशानुसार फार्मर आयडी ब्लॉक करण्याची कारवाई तहसीलदार यांनी करावी. म्हणजे कुणीही वहिवाटीचे व नकाशावरील शेतरस्ते अडवण्याचे धाडस करणार नाही.

# मुळाथडी परीसरात विजेचा कडकडाट अन् वादळ

### केळीच्याबागा भुईसपाट वीजपुरवठा खंडित । नेवासा - खुपटी रस्ता झाडे पडल्याने बंद



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पानेगांव** : दि. ३१रोजी सायंकाळी ७ वाजता जवळपास जिल्ह्यात सुरु झालेलं अवकाळीचं तांडव रात्री ९ वाजता थांबलं नेवासा खुपटी रोड वर चक्रीवादळ झाडं रस्त्यावर उन्मळून पडली त्यामुळे काही काळ रस्ता बंद झाला होता संबंधित विभागाने मशिनीच्या मदतीने रस्त्यावरील झाड बाजूला करून रस्ता मोकळा करण्यात आला.

नेवासे तालुक्यातील पश्चिमेला तसेच राहुरी तालुक्यातील पुर्व भागातील मुळाथडी परीसरात रविवारी खुपटी,चिंचबन, गोणेगांव, निंभारी, अंमळनेर करजगांव तामसवाडी वाटापूर,पानेगांव,मांजरी, शिरेगांव, खेडलेपरमानंद करजगांव आदी. गावामध्ये अचानक आलेल्या चक्रिवादळ विजेचा कडकडाट प्रचंड नुकसान झाले केळी मका, भुईसपाट झाले वादळीवाऱ्याने वीज पुरवठा खंडित झाला आहे. दि.१ रोजी दुपारी ४ वाजता वीजपुरवठा सुरळीत झाला.

**प्रतिक्रिया**- दि ३१ रविवारी झालेल्या चक्रीवादळाने केळी, मका भुईसपाट झाल्या असून तातडीने तहसील कृषी विभागाने पाहणी करून पंचनामे करण्यात यावे - **विठ्ठलराव शेटे, केळी उत्पादक शेतकरी गोणेगांव**

**प्रतिक्रिया**- रविवारी झालेल्या चक्रीवादळाने नेवासा-खुपटी-निंभारी रोडवर मोठी झाडे उन्मळून पडली होती तातडीने बाजूला घेवून रस्ता मोकळा करण्यात आला. **आनंद सोलट कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नेवासा**

## कर्तृत्वाचा राज्यस्तरीय गौरव; 'सौंदर्य कलावती पुरस्कार २०२६' सोहळा उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : कला, साहित्य, पत्रकारिता, समाजसेवा, सांस्कृतिक आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कर्तृत्वाचा गौरव करणारा राज्यस्तरीय 'सौंदर्य कलावती पुरस्कार २०२६' सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. राज्यभरातील विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. ज्येष्ठ अभिनेत्री निशिगंधा वाड यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सोहळ्याला सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी रिदम परिवाराच्या वतीने अभिनेत्री निशिगंधा वाड यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

पुरस्कार वितरणासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी सोहळ्याची रंगत अधिकच वाढविली. महिलांसाठी मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. प्रसिद्ध हेअर स्टायलिस्ट निलेश यादव यांनी आधुनिक हेअर कट्सची माहिती देत प्रात्यक्षिक सादर केले. तसेच गणेश वंदना, लावणी, फ्यूजन साँग आणि झुंबा ग्रुपच्या महिलांनी सादर केलेल्या नृत्याविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी विनोद वाघमारे, राधाकिसन वाघमारे, सुनील पाटील तसेच स्नेहमाला फाऊंडेशन यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांनी अशा उपक्रमांमुळे कला, संस्कृती, साहित्य आणि समाजकार्यास प्रोत्साहन मिळत असल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमास नगरसेविका नवनीतकौर लकी सेठी, रणजितदादा पाटील, निलेश यादव, शंकर सोनावणे, शहाजी दिघे, अँकर भाग्यश्री, प्रणिती चव्हाण, वैशाली पोटे, राजू बाणेदार, पार्वती वाघमारे, वैशाली कोते, डॉ. शीतल घोगरे, पुष्पा पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## सौ. सुशिलामाई काळे महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोळपेवाडी येथील कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीच्या सौ. सुशिलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांची सैन्य दल आणि पोलीस दलात निवड झाली असून यामध्ये दोन विद्यार्थीनींचा समावेश आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या अथक परिश्रमांच्या जोरावर जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनत घेवून हे यश संपादन केले असल्याची माहिती महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्या डॉ. विजया गुरसळ यांनी दिली आहे.

सौ. सुशिलामाई काळे महाविद्यालयाने नेहमीच विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबतच विविध क्षेत्रांत करिअर करण्यासाठी नेहमीच योग्य मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या मार्गदर्शनाच्या मदतीने स्वतःच्या कष्टाचा योग्य मेळ घालत महाविद्यालयातील विद्यार्थी रमेश घोडेराव याने देशसेवेचे आपले स्वप्न साकार केले असून त्याची भारतीय सैन्य दलामध्ये निवड झाली आहे.महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. वृषाली वाघ हिचे नागपूर ग्रामीण पोलीस दल आणि कु.आरती कलोर हिची मुंबई पोलीस दलामध्ये निवड झाली आहे. या दोन्ही रणरागिणींचे खाकी वर्दी परिधान करण्याचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

## प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेकडून डॉ. संदीप म्हस्के यांचा सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था ही ज्ञान, संस्कार आणि गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा जपणारी संस्था असून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा, सेवानिवृत्त सेवकांचा तसेच पीएच.डी. पदवी प्राप्त शिक्षकांचा संस्थेच्या वतीने सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या जिद्द, कठोर परिश्रम, चिकाटी आणि कर्तृत्वाचे मनःपूर्वक कौतुक करण्यात आले.




लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या आश्वी खुर्द येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यानिकेतन व कनिष्ठ महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विषयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. संदीप म्हस्के यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने वनस्पतीशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने आयोजित केलेल्या गुणवंत विद्यार्थी, सेवानिवृत्त सेवक व पीएच.डी. धारक शिक्षकांच्या सन्मान सोहळ्यात संस्थेचे अध्यक्ष तथा राज्याचे जलसंपदा मंत्री मा. डॉ. राधाकृष्ण विखे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे तसेच सहसचिव भारत घोगरे यांच्या हस्ते डॉ. म्हस्के यांचा सन्मान करण्यात आला.

## जेईईमध्ये अंशुल निर्मळचे घवघवीत यश आयआयटी मध्ये प्रवेश निश्चित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : देशातील अत्यंत कठीण आणि प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या जेईई मेन्स व जेईई अँडव्हान्स परीक्षांमध्ये श्रीरामपूरच्या अंशुल प्रवीण निर्मळ याने उज्ज्वल यश संपादन करून कुटुंबासह संपूर्ण परिसराचे नाव उंचावले आहे. अंशुलने जेईई मेन्स- २०२६ परीक्षेत ९९.५० पर्सेंटाइल मिळवले असून जेईई अँडव्हान्स परीक्षेत संपूर्ण भारतातून ८९५८ वी अखिल भारतीय रँक (-खठ) प्राप्त केली आहे. या यशामुळे त्याचा देशातील प्रतिष्ठित भारतीय तंत्रज्ञान संस्थांमध्ये (खखढ) प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला आहे.

अंशुल हा लहानपणापासूनच अभ्यासात सातत्याने प्रगती करणारा विद्यार्थी म्हणून ओळखला जातो. त्याने दहावीच्या परीक्षेत ९७ टक्के गुण मिळवत आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची चुणूक दाखवली होती. त्यानंतर विज्ञान शाखेत शिक्षण घेत असताना त्याने जेईई परीक्षेचे नियोजनबद्ध आणि सातत्यपूर्ण तयारीवर लक्ष केंद्रित केले. कठोर परिश्रम, नियमित अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर त्याने हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. बारावी बोर्डाच्या परीक्षेतही त्याने ९१% गुण मिळवले आहे.

अंशुल हा माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील सोलेस इन्फोटेक नासिक चे संस्थापक व उद्योजक प्रवीण निर्मळ यांचा सुपुत्र आहे. तसेच अंशुल हा औद्योगिक क्षेत्रातील नावाजलेल्या मेकापावर संस्थेचे संस्थापक प्रशांत निर्मळ व शिक्षण क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व, पेंटागॉन इन्स्टिट्यूटचे संचालक व केंब्रिज स्कूलचे संस्थापक प्रमोद निर्मळ यांचा पुतण्या आहे.

देशभरातील १५ लाख विद्यार्थ्यांमधून स्पर्धा करून जेईई ॲडव्हान्स्डमध्ये मानाचे स्थान मिळवणे ही मोठी कामगिरी मानली जाते. अंशुलच्या यशामुळे त्याच्या कुटुंबीयांमध्ये, शिक्षकांमध्ये आणि मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## श्रीरामपूर मर्चंट असोसिएशन श्रीरामपूर मर्चंट असोसिएशन च्या अध्यक्षपदी प्रवीण गुलाटी

### उपाध्यक्ष स्वप्नील चोरडिया , सचिव योगेश ओझा तसेच सहसचिव नंदकुमार कोठारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : श्रीरामपूर मर्चंट असोसिएशन च्या अध्यक्षपदी प्रवीण गुलाटी तर उपाध्यक्षपदी स्वप्नील चोरडिया तसेच सचिवपदी योगेश ओझा व सहसचिवपदी नंदकुमार कोठारी ह्यांची निवड खेळीमेळीच्या वातावरणात एकमताने बिनविरोध पार पडली. मावळते अध्यक्ष राहुल कोठारी ह्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया पार पडली.

अध्यक्षपदा साठी प्रवीण गुलाटी ह्याच्या नावाची सूचना पुरुषोतम् झंवर ह्यांनी दिली तर अनुमोदन बाळासाहेब खाबिया ह्यांनी दिले , उपाध्यक्षपदासाठी स्वप्नील चोरडिया ह्याच्या नावाची सूचना निलेश बोरावके ह्यांनी केली तर अनुमोदन संदीप अग्रवाल ह्यांनी दिले , सचिव पदासाठी योगेश ओझा ह्याच्या नावाची सूचना गौतम उपाध्ये ह्यांनी केली व अनुमोदन संजय कासलीवाल ह्यांनी केले.

तसेच सहसचिव पदासाठी नंदकुमार कोठारी ह्यांच्या नावाची सूचना दात्तात्रे धालपे ह्यांनी केली व अनुमोदन अनिल लुल्ला ह्यांनी दिले. निवडीच्या प्रक्रियेमध्ये निलेश नागले व धर्मेश शाह ह्यांनी सहभाग घेतला. निवडीनंतर नूतन अध्यक्ष प्रवीण गुलाटी म्हणाले संचालक मंडळाने आमच्यावर ठेवलेला विश्वास मोलाचा आहे . संस्थेचे नावलौकिक वाढवण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने एकता , प्रगती आणि सेवा ह्या तत्वावर सर्वांना सोबत घेऊन कार्य करू . असे मनोदय व्यक्त केले.

## केंद्र शासनाने काढलेल्या कांदा खरेदी परिपत्रकाची प्रहारच्यावतीने होळी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर केंद्र शासनाने काढलेल्या कांदा खरेदी परिपत्रकाच्या निषेधार्थ शेतकऱ्यांनी सोमवारी तीव्र आंदोलन करत परिपत्रकाची होळी केली. कांद्याला उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळत असल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी बोलताना अँड.पांडुरंग औताडे यांनी शासनावर गंभीर आरोप करत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबतीत एकसमान निर्णय घेण्याची आवश्यकता असताना केवळ नाशिकपुरता निर्णय घेणे म्हणजे शासनाचा शेतकऱ्यांमध्ये फूट पाडण्याचा डाव आहे असा आरोप केला आहे. उत्पादन खर्च प्रचंड वाढलेला असताना शासनाने सर्व शेतकऱ्यांना न्याय देण्याऐवजी निवडक बाजार समित्यांची घोषणा करून दिशाभूल सुरू केली आहे. केवळ पत्रकार परिषदांमधून घोषणा करून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत असे त्यांनी सांगितले. कांदा उत्पादनासाठी बियाणे, खत, औषधे, मजुरी, वाहतूक आणि साठवणूक यासाठी मोठा खर्च करावा लागत आहे. सध्याच्या परिस्थितीत कांदा उत्पादनाचा कमीत कमी खर्च २० ते २२ रुपये प्रति किलो इतका येत असताना बाजारात मात्र उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळत असल्याने शेतकरी पूर्णपणे आर्थिक संकटात सापडला आहे.

शासनाने या बाबीचा गांभीर्याने विचार करून कांद्याला जास्तीत जास्त दर द्यावा अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. मुख्यमंत्री सांगतील त्या बाजार समितीत कांदा नेऊन घालण्याची आमची तयारी आहे; मात्र शेतकऱ्यांच्या कांद्याला योग्य आणि परवडणारा जास्तीत जास्त भाव द्यावा. केवळ पत्रकार परिषदांमधून घोषणा करून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. शासनाने तात्काळ हमीभाव जाहीर करून थेट कांदा खरेदी सुरू करावी असेही अँड. पांडुरंग औताडे यांनी स्पष्ट केले. यावेळी बोलताना जिल्हा संपर्कप्रमुख बाळासाहेब खर्जुले यांनी कांदा उत्पादनाचा खर्च, मजुरी, खत, औषधे, वाहतूक आणि साठवणूक यांचा सविस्तर हिशोब मांडत शासनाने शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाचा विचार करून योग्य आणि परवडणारा भाव द्यावा, अशी भूमिका मांडली. शेतकरी रात्रंदिवस मेहनत करून पीक उभे करतो, मात्र बाजारात त्याच्या मालाला उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी शासनाने तात्काळ ठोस निर्णय घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. तालुका कार्याध्यक्ष अनिल विधाटे यांनी शासनाच्या अन्यायकारक धोरणामुळे शेतकरी पूर्णपणे उध्वस्त झाला आहे. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारात योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक आणि मानसिक संकटात सापडला आहे. शासनाने केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष मदत, हमीभाव आणि ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली. आंदोलनाबाबत तहसीलदार यांना पूर्वीच निवेदन देण्यात आले होते. शासनाच्या वतीने नायब तहसीलदार यांनी निवेदन स्वीकारून आंदोलकांच्या भावना शासनापर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिले. यावेळी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

आंदोलनकर्त्यांनी केंद्र शासनाच्या परिपत्रकाची प्रत जाळून निषेध व्यक्त केला. शासनाने तातडीने ठोस निर्णय न घेतल्यास आगामी काळात आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी प्रहारचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सांगळे, जिल्हा संपर्कप्रमुख बाळासाहेब खर्जुले, तालुकाध्यक्ष जालिंदर आरगडे, शहर प्रमुख विशाल शिरसाठ, युवक जिल्हा उपाध्यक्ष सचिन साबळे, तालुका कार्याध्यक्ष अनिल विधाटे, तालुका उपाध्यक्ष पांडुरंग नवले, शेतकरी प्रवीण विधाटे आदी उपस्थित होते.

## कागदपत्रे हरवली

मी रोहित दिलीप आसापुरकर, राहणार चितळी, तालुका राहता. मी बेंगलोरहून गावी चितळी, तालुका-राहता येथे येत असताना दिनांक १५ मे २०२३ रोजी प्रवासादरम्यान माझी काही कागदपत्रे गाळ झाली.

त्यात शाळा सोडल्याचा दाखला, मार्कलिस्ट या कागदपत्रांचा समावेश आहे. तरी ही कागदपत्रे कुणाला सापडली असल्यास किंवा त्याबद्दल कोणाला माहिती असल्यास माझ्याशी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**रोहित दिलीप आसापुरकर**
**रा.चितळी, ता.राहता,**
**जि.अहिल्यानगर**
**संपर्क : ९४०५५८४६९४**

# देडगाव येथे अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त बैलगाडा शर्यतींचा थरार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून नेवासा तालुक्यातील देडगाव येथे भव्य घोडाबैल गाडा शर्यतींचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत अटीतटीच्या आणि रोमहर्षक ठरलेल्या या शर्यती पाहण्यासाठी पंचक्रोशीतील हजारो बैलगाडा शौकिनांनी मोठी गर्दी केली होती. संपूर्ण परिसर 'माऊली..'सर्जा-राजा...' आणि 'जय अहिल्या'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. सकाळी गावातील मुख्य चौकात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व महाआरती करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



यानंतर मान्यवरांच्या हस्ते 'घाटाचा राजा' ठरणाऱ्या घोडाबैल गाडा शर्यतीचे विधिवत उद्घाटन प्रगतशील शेतकरी नारायण सदाशिव मुंगसे, सिद्धांत उद्योग समूहाचे सिद्धांत नवले, कवठ्याचे सरपंच प्रमोद गजभार, संभाजी लोंढे, आकाश चेडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी परिसरातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देडगावच्या प्रसिद्ध शर्यत घाटावर झालेल्या या स्पर्धेत सांगली, सातारा, पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतून आलेल्या शेकडो नामांकित बैलगाड्यांनी सहभाग घेतला होता. घाटातून सुटणाऱ्या बैलगाड्या, हवेत उडणारी धूळ आणि सेकंदा-सेकंदाला बदलणारे समीकरण पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. अनेक गाड्यांनी सेकंदाच्या काही भागावरून विजय-पराजय निश्चित केला. स्पर्धेत प्रथम, लक्ष्मण आबाजी पांढरे शंभो ग्रुप खडका यांनी ११,० ०० चे बक्षीस पटकावले.

द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या बैलगाडा मालकांना आकर्षक चषक आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. तसेच उत्कृष्ट ड्रायव्हर (चाबुकस्वार) आणि शर्यतीत वेगवान पळणाऱ्या बैलांच्या मालकांचाही विशेष सन्मान करण्यात आला. अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी बैलगाडा शर्यतींना मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व होता. प्रशासकीय नियमांचे पालन करून अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने ही स्पर्धा पार पडली, अशी माहिती गुजर गाडीवाला यांनी दिली. शर्यत शांततेत आणि सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी व यशस्वी होण्यासाठी पप्पू भिसे, सचिन गोयकर, राजेंद्र गोयकर, आशिष हिवाळे, ड. कृणाल शिंदे, संभाजी टकले, महेश मुंगसे, रवी बनसोडे, चेअरमन सागर बनसोडे, शैलेंद्र बनसोडे, पोपट बनसोडे, छत्रपती प्रतिष्ठानचे मच्छिंद्र मुंगसे, युवा नेते निलेश कोकरे,माजी चेअरमन खंडू कोकरे, चांगदेव टकले, रामा कोकरे व स्थानिक तरुण मंडळ आणि ग्रामस्थांनी चोख नियोजन केले होते.

या भव्य आयोजनामुळे देडगाव आणि परिसरातील क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## पान १ वरुन

### नीट पेपरफुटीचा मास्टर माईंड कुलकर्णीच्या इमारतीवर पालिकेचा हातोडा!

प्राध्यापक पी.व्ही. कुलकर्णीचे नाव आले होते, त्यानंतर सीबीआयने त्यांना अटकही केली. याप्रकरणी, कारवाईला वेग आला असून पी.व्ही. कुलकर्णी हे मूळ बीडमधील असल्याने त्यांचे शहरातील शाहू नगर भागात चार मजली इमारतीचे बांधकाम सुरू असल्याचे समोर आले होते. त्यानंतर, या बांधकामातील अवैधते बाबात पालिका प्रशासनाकडून नोटीस बजावल्यानंतर हे पाडकाम केले.

### मान्सूनपूर्वी राजकारणाचा मौसम

६ जागांवर उमेदवार देत असून शरद पवारांच्या राष्ट्रवादीने तीन म तदारसंघात उमेदवार दिले आहेत. त्यामुळे, या सर्व जागांवरील प्रमुख लढती आता निश्चित झाल्या असल्या तरी खरे चित्र ४ जून रोजीच स्पष्ट होणार आहे. दरम्यान, सोलापूर, अहिल्यानगर ठाणे ,जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग , नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली,अमरावती , धाराशिव-लातूर-बीड,परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर-जालना आणि नागपूर (पोटनिवडणूक) या १७ ठिकाणी ही निवडणूक होणार आहे. अहिल्यानगर मध्ये भाजपने राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांना आपल्या पोटात घेऊन उम ेदवारी दिली. काँग्रेसने ऐनवेळी उमेदवार बदलून नगर शहरातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दीप चव्हाण यांना उमेदवारी दिली. नाशिक मध्ये मात्र ठाकरे शिवसेनेने उमेदवार दिला नाही. पुण्यात टिंगरे नाराज - जिजाई बंगल्यावर सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची बैठक झाली. तब्बल दोन तास झालेल्या या बैठकीनंतर पक्षनेतृत्त्वाने विक्रम काकडे यांच्या नावावर उमेदवारीसाठी शिक्कामोर्तब केले. त्यासाठी विक्रम काकडे आणि संजय काकडे यांचा रितसर पक्षप्रवेश पार पडला. या बैठकीला पुण्यातील विधानपरिषदेसाठी इच्छूक असलेले सुनील टिंगरे हेदेखील उपस्थित होते. विक्रम काकडे यांचा पक्षप्रवेश होण्याच्या काही वेळ आधी सुनील टिंगरे जिजाई बंगल्यातून बाहेर पडले. त्यावेळी त्यांनी, 'मी पार्टी ऑफिसला पुढची तयारी करायला चाललो आहे. जुन्या पदाधिकाऱ्यांना संधी मिळणार', एवढेच बोलून ते तिथून निघाले. यानंतर सुनील टिंगरे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुण्यातील कार्यालयात पोहोचले आणि त्यांनी थेट विधानपरिषदेचा उमेदवारी अर्ज भरायची तयारी सुरु केली. तेव्हाच सुनील टिंगरे यांनी बंडखोरी केल्याचे स्पष्ट झाले. तोपर्यंत विक्रम काकडे हेदेखील पक्षप्रवेश आटोपून राष्ट्रवादीच्या कार्यालयात पोहोचले आणि फॉर्म भरायच्या तयारीला लागले. सुनील टिंगरे आणि विक्रम काकडे हे दोघेही अक्षरश: समोरासमोर बसून पुणे विधान परिषदेसाठी उमेदवारी अर्ज भरत होते. यावेळी दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांचा प्रचंड गोंधळ सुरु होता. राष्ट्रवादीच्या जुन्या कार्यकर्त्यांनी विक्रम काकडे यांच्यासमोर जाहीरपणे आपली नाराजी बोलून दाखवली.

महायुतीच्या जागावाटपात छत्रपती संभाजीनगर-जालना हा मतदारसंघ भाजपला सुटलेली असताना आणि भाजपने अधिकृत उमेदवार घोषित केलेला असतानाही, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार अब्दुल सत्तार यांचे पुत्र समीर सत्तार यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. भाजप शिवसेनेचे मुंडके छाटण्याचे काम करत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन्ही शिवसेना एकत्र करण्याचा विचार केल्यास काय होईल, याचा विचार भाजपने करावा, असेही ते म्हणाले. त्यामुळे महायुतीत शिवसेनेकडून बंडखोरी होणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### श्रीरामपुरात दोन तरुण शेतकऱ्यांची आत्महत्या

सुत्रांनी सागितले, ही पोलिसांनी हस्तगत केली असून, त्यामध्ये तीन व्यक्तीचे नावे असल्याचे पोलिसांनी माहिति दिली.याच तीन व्यक्तीच्या त्रासाला कंटाळून त्याने आत्महत्या केली ? की अन्य कारणाने केली यांचा तपास पोलिस करीत आहेत.
तसेच मालुंजे येथील अशोक वाघ हे मजूर म्हणून काम करत होते. त्यांनी गळफास का? घेतला यांची माहिती मिळू शकली नाही.
त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, भावजाई, मुलगा, मुलगी असा परिवार आहे.अशोक वाघ यांनी आत्महत्या का केली यांचे कारण मात्र मिळू शकले नाही.पोलिसांना या घटनेची माहिती कळताच पोलिसांनी घटनास्थळी जाऊन चौकशी केली. याप्रकरणी अकस्म ात मृत्यूची नोंद करण्यात आली. सोमवारी सकाळी शोकाकूल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्यामागे पश्चात आई, पत्नी, दोन मुले, भाऊ,भावजयी असा परिवार आहेत. याबाबत श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मुत्यूची नोंद ३३ / २०२६ करण्यात आली असून, पुढील तपास श्रीरामपुर तालुका पोलिस करीत आहेत

....

### लोखंडी हॉर्डिंग अंगावर पडल्याने तरुण ठार, सदोष मनुष्यवधाचा गन्हा

याने अमीत मोहन सुकाळे (वय २४ वर्षे) यास सदरच्या फलकास जीवघेण्या परिस्थितीची जाणीव असताना कोणतेही सुरक्षिततेचे साधन प्रदान न करता छिद्र पाड असे बजावले. अमित याने विकास सायकर याच्या म्हणण्यानुसार तात्काळ त्या होर्डिंगवर चढत काम करीत असताना अचानक सुसाट्याचा वाऱ्याची गती अधिक झाली आणि त्यात लोखंडी होर्डिंगसह अमित जागेवर कोसळला.
यात त्याच्या डोक्याला, पायाला, हाताला जबर मार लागला. जखमी तरुणाला तात्काळ उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारा दरम्यान त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. राजू दौलत मोरे यांच्या फिर्यादीवरून कर्जत पोलीस ठाण्यात विकास लहु सायकर याच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला.
या घटनेने पुन्हा एकदा अनधिकृत फलक, फ्लेक्स आणि होर्डिंगचा मुद्दा ऐरणीवर आला असून आगामी काळात पावसाच्या दिवस असल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेवर प्रश्न उभा राहिला आहे.

### काष्टीमध्ये तरुणीला बुरखा घालण्यासाठी दबाव

का बोलत नाही, घराबाहेर जायचे नाही, असे म्हणत घराजवळील विटेने तिच्या हातापायावर मारहाण केली. आरडाओरडा ऐकून फिर्यादीची आई घटनास्थळी आली. त्यानंतर मामाला बोलावण्यात आले असता आरोपीने त्यांनाही जातीवाचक शिवीगाळ व दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.या प्रकरणी श्रीगोंदा पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३५१(२), ३५२ तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३(१)(A)(s)(va) अन्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.दरम्यान, या संवेदनशील प्रकरणाचा पुढील तपास कर्जत उपविभागीय पोलीस उपअधीक्षक गणेश उगले हे करत आहेत. घटनेमुळे काष्टी परिसरात मोठी खळबळ उडाली असून आरोपीवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

..............

### सासरच्या जाचाला कंटाळून जावयाची आत्महत्या!

संबंधित तरुणाने विष प्राशन केल्याने त्याची प्रकृती बिघडल्याने त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. मृत्यूची माहिती मि ळाल्यानंतर कुटुंबीयांनी या घटनेबाबत संशय व्यक्त करत पोलीस ठाण्यात धाव घेतली.

मृताच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीत मुलाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा आरोप सासरच्या काही व्यक्तींवर केला असून, संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी तक्रार स्वीकारून प्रकरणाची नोंद घेतली असून, घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

पोलीस तपास पूर्ण करुन सर्व बाबींची शहानिशा करून पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. सध्या धोंड्याचा महिना सुरू आहे या कालावधीत जावयाला सासुरवाडीला बोलावून गोड गोड जेवण करून बक्षीस देण्याची जुनी परंपरा आहे मात्र धोंड्याच्या महिन्यातच जावयाने विष पिऊन आत्म हत्या केल्याच्या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# वैजापूर येथे विविध मागण्यांसाठी काँग्रेसचे तहसील कार्यालयावर मोर्चा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**वैजापूर** : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने तालुका अध्यक्ष राहुल विलासराव संत यांच्या नेतृत्वाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापासून तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात आला. यावेळी विविध जनहिताच्या मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले.

निवेदनात कांद्याला २५०० रुपये प्रतिक्विंटल भाव देण्याची मागणी, शेतमालाला योग्य भाव मिळावा, पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमती कमी कराव्यात, वैजापूर तालुका तहसील चा पुरवठा विभागातील अनियमिततेची चौकशी करावी, नीट परीक्षा घोटाळ्यातील दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच बनावट खतांच्या काळाबाजाराला आळा घालावा आदी मागण्या करण्यात आल्या.

मोर्चामध्ये राहुल संत, सुनील बोडखे प्रवीण खाजेकर, साहेबराव पडवळ, रोहित आहेर, शाक्यसिंह त्रिभुवन, अक्षय रोठे, अशोक चव्हाण, राजू शेख, प्रदीप जाधव, सफल त्रिभुवन, फैय्याज सय्यद यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी नागरिकांच्या विविध समस्या प्रशासनासमोर मांडून त्या तातडीने सोडविण्याची मागणी करण्यात आली. तहसीलदारांना निवेदन सादर करून मागण्यांवर त्वरित कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

## बालाजी देडगाव येथे अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. सर्वप्रथम प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रमुख मान्यवरांनी आपल्या मनोगतातून अहिल्यादेवी



होळकर यांच्या जीवनकार्याचा परिचय दिला. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून पप्पू भिसे, माजी चेअरमन लक्ष्मण बनसोडे, युवा नेते निलेश कोकरे, राजू गोयकर, राजेंद्र बनसोडे सर, अनिल पेटे सर, मच्छिंद्र मुंगसे, सचिन गोयकर, पोपट बनसोडे, राधाकिसन बनसोडे, चंदू बनसोडे, ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके, भाजप नेते आकाश चेडे, भास्करराव तांबे, सागर बनसोडे, चांगदेव टकले, आबा बनसोडे, शैलेंद्र बनसोडे, पिंटू हिवाळे, बंडू टकले, महेश मुंगसे, लक्ष्मण कोकरे, इंन्नुस पठाण, अरुण मुंगसे, मयूर चेडे, महेश चेडे, विठ्ठल टकले, नारायण सदाशिव मुंगसे, संभाजी टकले, चांगदेव टकले, भाऊसाहेब सावंत, सोमा मुंगसे, मधुदेवा तांदळे आदी उपस्थित होते. शेवटी पप्पू भिसे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## कर्तव्यात कसूर करणाऱ्या ग्रामसेवकाचे वेतन कपात करा : कविता चव्हाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**गंगापूर** : तालुक्यातील कर्तव्यात कसूर करणाऱ्या ग्रासेवकांचे वेतन कपात करुन कडक कारवाई करण्याची मागणी गंगापूर पंचायत समितीच्या सभापती कविता चव्हाण यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की आमदार प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनात व सूचनेनुसार सलग दोन दिवस गंगापूर तालुक्यातील ग्रामसेवकांच्या कामकाजाबाबत आढावा घेताना अत्यंत धक्कादायक बाबी समोर आल्या असून यामध्ये ग्रामसेवक हे कर्तव्यात कसूर करीत असल्याचे निदर्शनास आले आहेत.सुरुवातीला त्रयस्थ यंत्रणेमार्फत ग्रामसेवक आपल्या नियुक्तीच्या ठिकाणी गावात आहेत किंवा नाही याबाबत खात्री केली. दुसऱ्या दिवशी सभापती कविता रविंद्र चव्हाण यांच्या स्वीय सहाय्यकांमार्फत प्रत्येक ग्रामसेवकांना संपर्क करून ते त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी कार्यरत



आहे. किंवा नाही, याबाबत पुन्हा खात्री केली असता तब्बल २२ ग्रामसेवकांचे मोबाईल बंद असल्याचे आढळून आले. तसेच २० ग्रामसेवकांनी नियुक्तीच्या ठिकाणी असल्याची खोटी माहिती दिली. त्यांना लाईव्ह लोकेशन मागितल्यानंतर फक्त तीन लोकांनी लाईव्ह लोकेशन पाठवले. व उर्वरित ग्रामसेवकांनी इकडे आहे-तिकडे आहे कामानिमित्त बाहेर आहे असे उडवा उडवीचे उत्तरे देण्यात आली सलग दोन दिवस घेतलेल्या आढाव्याचा संपूर्ण अहवाल आपल्या अवलोकनार्थ देत असून, यापुढे रोज ग्रामसेवकांकडून त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित असल्याबाबतचे जिओ टॅगचे फोटो मागवावेत. जे ग्रामसेवक कामचुकारपणा करतील, त्यांची वेतन कपात करुन कडक कारवाई करण्याची मागणी सभापती कविता चव्हाण यांनी निवेदनाद्वरे केली आहे.निवेदनावर कविता चव्हाण यांची स्वाक्षरी असुन निवेदनाच्या प्रती आमदार प्रशांत बंब जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू.पि.एम यांना देण्यात आल्या आहेत.

## रोटेगाव रेल्वे स्टेशनवर प्रवाशी सुविधा पुरवा ; जेष्ठांची मागणी

**वैजापूर** : दक्षिण मध्य रेल्वे विभागीय व्यवस्थापक नांदेड यांनी येत्या १२जून, रोजी मराठवाडा विभागातील सर्व खासदारांची रेल्वे प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी व प्रवाशी सुविधा बाबत चर्चास्तव, नांदेड येथे बैठक बोलाविलेली आहे. त्या अनुषंगाने येथील वैजिनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघाच्या जेष्ठ नागरिकांनी जिल्ह्यातील एकमेव अमृत भारत दर्जा मिळालेल्या रोटेगाव (दमरे)स्थानकावर रेल्वेने जाणारे जेष्ठ नागरिक व प्रवाशी यांच्यासाठी सर्व सुविधा पुरविण्यात याव्यात या साठी सोमवार(ता,०१)रोजी रोटेगाव द.म.रे चे स्टेशन अधीक्षक रमेशचंद्र मीना यांना एक निवेदन सादर केले आहे. ज्यात नांदेड-पुणे-हडपसर एक्सप्रेस नरसापूर-नगरसोल एक्सप्रेस, हिंगोली-मुंबई (सीएसटी) जनशताब्दी एक्सप्रेस,

नांदेड-अमृतसर-सचखंड एक्सप्रेस या व ईतर (अप -डाऊन) रेल्वे गाड्याना थांबा देण्याची मागणी केली आहे.निवेदनात पुढे मागणी आहे की,रोटेगाव पासून ३ की.मी.अंतरावर संभाजीनगर जिल्ह्यातील सर्वात मोठा तालुका वैजापूर शहर आहे.शहरात महसूल,कृषी

वन विभाग,भूमी अभिलेख व पोलीस खात्याची विभागीय कार्यालये आहेत.दोन वैद्यकीय महाविद्यालये आहेत,तीन अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत, जिल्हा सत्र न्यायालय आहे,आर. टी.ओ.कार्यालय आहे, जिल्ह्यातील मोठी व्यापार पेठ आहे, शिर्डी फक्त ४०की.मी.अंतरावर आहे,मोठी व्यापारी पेठ आहे,३ नर्सिंग कॉलेज आहेत,तीन कृषी महाविद्यालये आहेत.येथून शेकडो व्यापारी,रुग्ण,प्रवासी मुंबई,पुणे,नाशिक,संभाजीनगर,जालना,नांदेड येथे दररोज जातात, रोटेगाव स्टेशन लगत तीन हजार एकरावर मोठी नियोजीत एम.आय.डी. आहे,दोन साखर कारखाने आहेत, येथून पुण्याला तीन बसेस,व मुंबईला दोन बसेस दररोज भरून जातात, रोटेगाव रेल्वे स्टेशन हे दमरे विभागाला मनमाड-छत्रपती संभाजीनगर या दरम्यान च्या सर्व स्टेशनात दररोज सर्वाधिक आर्थिक उत्पन्न मिळवून देणारे एकमेव स्टेशन आह. या सर्व बाबीचा विचार करता रोटेगाव (दमरे)येथे वरील सर्व रेल्वे चा थांबा आवश्यक आहे असे निवेदनात नमूद करून या स्थानकावर आसन व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ,कॅन्टीन व्यवस्था बाबत ही मागण्या आहेत.

सदरील निवेदन जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाश बोथरा, सचिव धोंडीरामसिंह राजपूत, कोषाध्यक्ष सुरेश संत,बबन क्षीरसागर, महापुरे व प्रवाशी यांनी मीना याना देऊन येत्या बैठकीत वरील मागण्या ठेवण्याची विनंती केली. मीना यांनी सदरील निवेदन तात्काळ विभागीय रेल्वे अधिकाऱ्यांना पाठवत असल्याचे आश्वासन दिले.

## ग्राम रोजगार सहाय्यकपदी अनिता पवार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**गंगापूर** : तालुक्यातील किन्हळ दे्हळ येथील ग्राम रोजगार सहाय्यक पदी अनिता पवार यांची निवड करण्यात आली आहे. काही दिवसापूर्वी पंचायत समिती सभापतींनी मागील रोजगार सहायक भारत पवार यांच्यावर भ्रष्टाचार चें आरोप करत त्यांना प्रशासनाने सेवेतून मुक्त केले होते. त्यामुळे ग्रामपंचायत मध्ये पद रिक्त झाले होते. ग्रामरोजगार सहाय्यकाच्या निवडीसाठी घेण्यात आलेल्या विशेष ग्रामसभेत रोजगार सहाय्यक या पदासाठी एकूण १८ अर्ज प्राप्त झाले होते, ग्रामस्थांनी सर्वानुमते अनिता भारत पवार यांची ग्रामरोजगार सहाय्यक म्हणून शिफारस करत बिनविरोध निवड करण्यात आली.

ग्रामसेवक आर. डी. साळुंखे यांनी ग्रामसभेचे कामकाज पाहिले.प्रमोद बनकर सूचक तर कैलास सोमासे यांनी अनुमोदन दिले. निवड झाल्यावर ग्रामस्थांनी गुलाल उधळत मोठा जल्लोष साजरा केला.

## संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी चिंतन सोहळ्यास प्रारंभ

नेवासा : ग्रंथराज ज्ञानेश्वरी व अमृतानुभव ग्रंथाचे रचनास्थान असलेल्या नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरामध्ये अधिक मासाच्या निमित्ताने वेदांताचार्य महंत देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांच्या वाणीतून संगीतमय ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी चिंतन सोहळ्यास संत माऊलींच्या मूर्तीचे पूजन करून दिपप्रज्वलनाने प्रारंभ करण्यात आला. ब्रम्ह विद्येची खान असलेल्या ज्ञानेश्वरीचे श्रवण मनन चिंतन केल्यास मनुष्याला जीवनात विवेकाची प्राप्ती होईल असे प्रतिपादन वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांनी यावेळी बोलतांना केले.

यावेळी ज्ञानेश्वर चिंतन सोहळयाच्या शुभारंभ प्रसंगी वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री, देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, रामायणाचार्य नंदकिशोर महाराज खरात, गहिनीनाथ महाराज आढाव, राम महाराज खरवंडीकर, अंजाबापू महाराज कर्डीले, हरि महाराज भोगे, मंगेश महाराज वाघ, कोंडीराम महाराज पेचे,राजेंद्र महाराज आसने,विश्वस्त ज्ञानेश्वर माऊली शिंदे,भिकाजी जंगले,रामभाऊ जगताप,कृष्णाभाऊ पिसोटे,कैलास जाधव,जनसंपर्क अधिकारी भैय्या कावरे, डॉ.संजय सुकाळकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी आलेल्या सर्व संत महंत व माऊली भक्तांचे संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. हिंदू धर्मामध्ये अधिक मास हा भगवान विष्णूचा कर्मयोग,भक्ती आणि आत्मचिंतन शिकवणारा पवित्र कालखंड मानला जात असल्याने भगवत गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील ५४ व्या श्लोकात अर्जुनाने भगवान श्रीकृष्णांना स्थितप्रज्ञ कोण? असा प्रश्न विचारला त्यावर भगवान श्रीकृष्णांनी संत, महात्मा, ज्ञानी पुरुष यांचे स्वरूप स्पष्ट करणारे अमूल्य विचार मांडले याच श्लोकांचे संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या दुसऱ्या अध्यायातील शेवटच्या ८६ ओव्यांमधून अत्यंत सखोल आणि रसाळ विवेचन केले ते विवेचन आपल्याला वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या वाणीतून श्रवण करायला मिळणार असल्याने माऊली भक्तांनी ज्ञानेश्वरी चिंतन सोहळयाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

सोहळ्याच्या पहिल्या दिवशी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, विश्वस्त कृष्णाभाऊ पिसोटे, कैलास जाधव यांच्या हस्ते संतपूजन करण्यात आले. झालेल्या संगीतमय ज्ञानेश्वरी चिंतन सोहळयाच्या प्रसंगी गायनाचार्य ज्ञानेश्वर माऊली शिंदे, अंजाबापू कर्डीले, गहिनीनाथ महाराज आढाव यांनी (गायन),नवनाथ महाराज आगळे (मृदुंग), कृष्णा महाराज कुलकर्णी (तबला) यांनी उत्कृष्ट संगीत साथ दिली.

अधिक पुरुषोत्तम मासाचे औचित्य साधून संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे अध्यक्ष व विश्वस्त मंडळाच्या संकल्पनेतून सुरू झालेला ग्रंथराज ज्ञानेश्वरी चिंतन सोहळा सायंकाळी ७ ते ९ यावेळेत होत असल्याने अधिक मासाच्या पर्वकाळात सुरू झालेल्या चिंतन सोहळयाचा माऊली भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानच्या वतीने यावेळी करण्यात आले. यावेळी शेवगाव तालुक्यातील हिंगणगाव व देवटाकळी येथील ग्रामस्थांच्या वतीने उपस्थित भाविकांना आमटी भाकरीच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले.

## टाकळीभान येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
टाकळीभान: श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त माजी सभापती नानासाहेब पवार यांच्या संपर्क कार्यालयामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात येऊन त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजी सभापती नानासाहेब पवार, शंकरराव शिंदे, सोसायटीचे व्हा. चेअरमन अविनाश लोखंडे, अशोक धोत्रे, बाळासाहेब शेळके, मिथुन जाधव, संतोष जाधव,दिलीप लांडे, किरण राऊत, राजेंद्र राऊत, ईश्वरी जाधव ,हर्षदा जाधव आदी उपस्थित होते.



## मातेरे परिवारातर्फे वाबळे महाराज यांचे संतपूजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**शिर्डी** : महाराष्ट्रातील थोर समाज प्रबोधनकार हभप ज्ञानेश्वर महाराज वाबळे तथा माऊली यांचे सावळीविहीर येथील रहिवासी व मुंबईतील उद्योजक संजय मातेरे यांचे कडून त्यांच्या सामाजीक योगदानाबद्दल संतपूजन करण्यात आले . हभप ज्ञानेश्वर महाराज वाबळे हे महाराष्ट्रात शिवराय ते भिमराय हा विचार घेऊन महाराष्ट्र पिंजून काढत असून जातीय सलोखा राखण्यासाठी त्यांचे मोठे योगदान आहे . किर्तनातून मिळालेल्या दानातून ते गरजवंत मुलांना लष्करात तसेच पोलीस प्रशासनात भरती साठी पुण्यात विद्यार्थ्यांचे निवास व त्यांची फि भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात मदत करत आहे .त्यांचा हिंदू धर्मातील वारकरी संप्रदाय व भगवान गौतम बुद्धांच्या धम्माचे ते गाढे उपासक आहेत यांनी रमाई भिमाई सावित्रीबाई, फातीमा शेख अहिल्याबाई यांच्या जिवनाचा माध्यमातून स्त्रि साक्षर करण्यासाठी मोठं प्रबोधन सुरु आहे . आज त्यांच्या वृद्धापकाळात ही तरुणाला लाजवेल अशा प्रकारे पायाला फिंगरी लाऊन किर्तनाचे माध्यमातून रात्रंदिवस प्रचार आणि प्रसाराचे काम त्यांनी हाती घेतले आहे . त्यांच्या या कार्याची दखल घेत वाबळे महाराज शिर्डी दौऱ्यावर आले असता मुंबई येथील उद्योजक संजय लक्ष्मण मातेरे व सौ शितल संजय मातेरे यांचे निवासस्थानी वाबळे महाराज यांचे नुकतेच संतपूजन करून आर्शिवाद प्राप्त केले आहे .

**नावात बदल**
माझे जुने नाव वेन्कटेश (VENKATESH) सुरेश अहिरे (माझे दहावीचे बोर्ड सर्टिफिकेट ,मार्कशीट शाळेचा दाखला वरील नाव) असे असून माझे नवीन नाव व्यंकटेश (VYANKATESH) सुरेश अहिरे असे खरे नाव आहे दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून इतर दुसरी कोणतीही अन्य व्यक्ती नाही.
**प्रतिज्ञापत्र**
**क्र. २६५२२४२०४१२६८१००६८१०३१**
**दिनांक २९/०५/२०२६**

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**
**मंगळवार दि . २ जून २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत
१९० २८० २२६ | ०-६ | १२३ ४४८ ८८० | जोड ०१-५६-२४-७३-६९

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत
१८० २८९ २२५ | ९-३ | १२० १३९ ३३७ | जोड ९०-४३-८६-१२-३५

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत
१४० २३० ७८० | ५-४ | १३० २४८ ४४६ | जोड ५६-९४-२३-०८-४७

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**शुभ लाभ**

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 09/03/2026 | 2 | | 2 | 1 | | 8 | 5 | | 8 | 2 | | 1 | 3 | | 1 |
| To | 3 | 16 | 4 | 6 | 56 | 8 | 7 | 05 | 8 | 4 | 43 | 4 | 3 | 09 | 3 |
| 13/03/2026 | 6 | | 0 | 8 | | 0 | 8 | | 9 | 8 | | 8 | 4 | | 5 |
| 16/03/2026 | 4 | | 8 | 2 | | 3 | 4 | | 4 | 1 | | 1 | 6 | | 3 |
| to | 5 | 56 | 9 | 0 | 21 | 8 | 6 | 02 | 9 | 2 | 02 | 3 | 7 | 38 | 7 |
| 20/03/2026 | 6 | | 9 | 0 | | 0 | 0 | | 9 | 7 | | 8 | 0 | | 8 |
| 23/03/2026 | 6 | | 3 | 4 | | 1 | 5 | | 7 | 1 | | 2 | 3 | | 1 |
| to | 8 | 34 | 5 | 5 | 46 | 7 | 6 | 03 | 8 | 3 | 46 | 4 | 3 | 64 | 6 |
| 27/03/2026 | 9 | | 6 | 5 | | 8 | 9 | | 8 | 0 | | 0 | 0 | | 7 |
| 30/03/2026 | 2 | | 1 | 1 | | 1 | 2 | | 1 | 1 | | 1 | 1 | | 2 |
| to | 8 | 90 | 3 | 3 | 87 | 6 | 7 | 97 | 1 | 1 | 12 | 5 | 6 | 66 | 5 |
| 03/04/2026 | 9 | | 6 | 4 | | 0 | 0 | | 9 | 9 | | 6 | 9 | | 9 |
| 06/04/2026 | 1 | | 2 | 1 | | 7 | 1 | | 4 | 3 | | 1 | 1 | | 4 |
| to | 3 | 70 | 2 | 4 | 02 | 7 | 3 | 98 | 7 | 5 | 82 | 5 | 2 | 78 | 6 |
| 10/04/2026 | 3 | | 6 | 5 | | 8 | 5 | | 7 | 0 | | 6 | 4 | | 8 |
| 13/04/2026 | 5 | | 1 | 1 | | 6 | 2 | | 5 | 1 | | 8 | 2 | | 1 |
| to | 6 | 06 | 5 | 4 | 43 | 7 | 3 | 45 | 0 | 3 | 77 | 9 | 6 | 85 | 4 |
| 17/04/2026 | 9 | | 0 | 9 | | 0 | 9 | | 0 | 3 | | 0 | 0 | | 0 |
| 20/04/2026 | 5 | | 1 | 8 | | 4 | 1 | | 3 | 5 | | 3 | 3 | | 3 |
| to | 7 | 00 | 2 | 8 | 58 | 5 | 2 | 53 | 5 | 5 | 71 | 8 | 4 | 68 | 7 |
| 24/04/2026 | 8 | | 7 | 9 | | 9 | 2 | | 5 | 7 | | 0 | 9 | | 8 |
| 27/04/2026 | 3 | | 1 | 4 | | 7 | 1 | | 1 | 6 | | 1 | 6 | | 2 |
| to | 5 | 63 | 2 | 4 | 85 | 8 | 6 | 71 | 2 | 7 | 29 | 9 | 8 | 27 | 5 |
| 01/05/2026 | 8 | | 0 | 0 | | 0 | 0 | | 8 | 9 | | 9 | 8 | | 0 |
| 04/05/2026 | 1 | | 3 | 1 | | 6 | 2 | | 2 | 2 | | 2 | 2 | | 2 |
| to | 7 | 71 | 9 | 4 | 34 | 8 | 3 | 48 | 7 | 4 | 25 | 5 | 4 | 66 | 5 |
| 08/05/2026 | 9 | | 9 | 8 | | 0 | 9 | | 9 | 6 | | 8 | 0 | | 9 |
| 11/05/2026 | 5 | | 2 | 3 | | 2 | 6 | | 2 | 1 | | 1 | 4 | | 1 |
| to | 6 | 79 | 7 | 7 | 04 | 3 | 0 | 68 | 3 | 9 | 01 | 2 | 7 | 85 | 5 |
| 15/05/2026 | 6 | | 0 | 0 | | 9 | 0 | | 3 | 0 | | 8 | 7 | | 9 |
| 18/05/2026 | 8 | | 4 | 5 | | 1 | 1 | | 1 | 7 | | 4 | 2 | | 2 |
| to | 9 | 79 | 5 | 6 | 96 | 7 | 4 | 22 | 2 | 8 | 30 | 8 | 8 | 93 | 5 |
| 22/05/2026 | 0 | | 0 | 8 | | 8 | 7 | | 9 | 8 | | 8 | 9 | | 6 |
| 25/05/2026 | 5 | | 2 | 3 | | 1 | 8 | | 4 | 1 | | 2 | 4 | | 5 |
| to | 6 | 11 | 9 | 4 | 37 | 3 | 9 | 78 | 6 | 9 | 05 | 5 | 6 | 06 | 5 |
| 29/05/2026 | 0 | | 0 | 6 | | 3 | 0 | | 8 | 0 | | 8 | 0 | | 6 |
| 01/06/2026 | | | | | | | | | | | | | | | |
| to | | | | | | | | | | | | | | | |
| 05/06/2026 | | | | | | | | | | | | | | | |

## द•ख•ल

### नवनागापूर परिसरात घरफोडी दोन महागडे मोबाईल चोरीला

**अहिल्यानगर :** शहरातील नवनागापूर परिसरामध्ये असलेल्या दूध डेअरी चौक, दत्तमंदिर भागात घरफोडीची एक घटना समोर आली आहे. राहत्या घराचा दरवाजा उघडून आत प्रवेश करत अज्ञात चोरट्याने दोन महागडे मोबाईल फोन चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी घनशाम नवनाथ मुंढे (वय २१, रा. पश्चिगरी, ता. पाटोदा, जि. बीड, सध्या रा. दूध डेअरी चौक, नवनागापूर, अहिल्यानगर) हा आपल्या मित्रासोबत या भागात राहतो. रात्रीच्या वेळी सर्वजण झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने घराचा दरवाजा उघडून आत प्रवेश केला. चोरट्याने घरात ठेवलेला फिर्यादीचा ३० हजार रुपये आणि त्याच्या मित्राचा २० हजार रुपये किमतीचा असे एकूण ५० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन चोरून नेले. हा प्रकार लक्षात आल्यानंतर घनशाम मुंढे याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

### गंज बाजारात घातक हत्यारांसह दहशत निर्माण करणारा तरुण गजाआड

**अहिल्यानगर :** शहरातील गंजबाजार भागात धारदार चाकू आणि एअर पिस्टल बाळगून सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्या एका तरुणाला कोतवाली पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, गंजबाजार परिसरात एक तरुण हातात हत्यारे घेऊन आरडाओरड करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल सुरज दिलीप कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतीक भीमराव गायकवाड (वय २३, रा. पाईपलाईन रोड, अहिल्यानगर) असे पकडण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. ही कारवाई शनिवार, दिनांक ३० मे रोजी रात्री पावणेअकरा वाजेच्या सुमारास करण्यात आली. आरोपी गंजबाजार येथे हातात चाकू आणि एअर पिस्टल घेऊन फिरत होता. तो मोठ्याने ओरडून परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करत होता. यामुळे नागरिक घाबरले होते. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन आरोपीला पकडले. त्याच्याकडून शंभर रुपये किमतीचा १० इंच लांबीचा धारदार लोखंडी चाकू आणि तीन हजार रुपये किमतीची एक लोखंडी एअर पिस्टल जप्त करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार व्ही. आर. बोरगे आणि महिला पोलीस अंमलदार वैशाली पठारे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### साईदीप हिरोजवर मात करत एस.के. बी. संघाचा दिमाखदार विजय



**अहिल्यानगर :** शहरातील वाकोडी येथील साईदीप क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या १२ वर्षांखालील मुलांच्या लेदर बॉल टी-२० क्रिकेट लीग स्पर्धेचा अंतिम सामना अत्यंत रंगतदार वातावरणात पार पडला. अंतिम सामन्यात एसके बी संघाने साईदीप हिरोज संघावर ७ गडी राखून शानदार विजय मिळवत विजेतेपद पटकावले. लहानग्या क्रिकेटपटूंनी दाखवलेल्या खेळकौशल्यामुळे उपस्थित प्रेक्षकांनी सामन्याचा मनमुराद आनंद लुटला.अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना साईदीप हिरोज संघाने २५ षटकांत ४ गडी गमावत १२२ धावांचे आव्हान उभे केले. संघाच्या डावात आदर्श पटेल याने संयमी व आकर्षक फलंदाजी करत ५८ चेंडूत ५५ धावांची खेळी साकारली. त्याला वरद कुलांगे याने ३६ धावांची मोलाची साथ दिली. दोघांच्या भागीदारीमुळे साईदीप हिरोज संघाला समाधानकारक धावसंख्या उभारता आली. १२३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना एसके बी संघाने सुरुवातीपासूनच आत्मविश्वासपूर्ण खेळ केला. संघाकडून कृष्णा जाधव याने ५१ चेंडूत ५० धावांची दमदार खेळी करत विजयाचा पाया रचला. धनंजय जरे यानेही ४८ धावांची प्रभावी खेळी साकारत संघाला विजयाच्या उंबरठ्यावर नेले.

### पोस्टमन कांबळेंची वांगदरी गावाला उत्तम सेवा : नागवडे



**लिंपणगाव :** वांगदरी गावचे भूषण डाक विभागातील कर्मचारी बापूराव कांबळे यांनी वांगदरी गावाला उत्तम प्रकारे सेवा दिली असे गौरवोद्गार सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी व्यक्त केले. वांगदरी येथील पोस्टमन बापूराव कांबळे हे नुकतेच डाक विभागातून सेवानिवृत्त झाले, त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त नुकताच गावचेवतीने सपत्नीक सत्कार नागरी सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानी सहकारमहर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे तर प्रमुख पाहुणे म्हणून बबन मदने, विठ्ठलराव नागवडे, अमित देशमुख हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाहू राऊत व लाला नागवडे यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी शिवांश, शुभांगी महेश कांबळे या त्यांच्या नातवाच्या मनोगताने झाली. त्यांनी आपल्या आजोबां विषयी अनेक चांगल्या भावना व्यक्त केल्या. त्यांच्या मैत्रीचे किस्से सांगितले. यावेळी वांगदरी गावचे सरपंच तुषार नागवडे, संदीप नागवडे, भाऊ राऊत, पवार साहेब, ह.भ.प. कदम महाराज, सुभाष गोरे, आप्पासाहेब जगताप, विठ्ठल नागवडे बबन मदने, अमित देशमुख, आनंदराव पवार यांनी मनोगत व्यक्त केले. बापूराव कांबळे यांनी केलेल्या कार्याचा गुणगौरव केला. यावेळी बापूराव कांबळे यांची घोड्यावरून डीजेच्या तालावर संपूर्ण वांगदरी गावात मिरवणूक काढण्यात आली. ग्रामदेवताचे दर्शन घेतल्यानंतर, त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी ह.भ.प. दत्तात्रय लाटे महाराज यांचे पोष्ट, पोस्टमन, पिनकोड व पत्र या विषयावर प्रवचन झाले. डाक विभागातील श्रीगोंदा कारखान्याचे पोस्ट मास्तर स्वप्निल सूर्यवंशी, अहिल्यानगर सोसायटीचे चेअरमन भीमराज गिरमकर, टपाल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष आनंदराव पवार, संतोष अवचरे, वाल्मीक जाधव, शरद अवचट, रोहिणी राऊत, संतोष शिंदे, बंडू रंधवे, विनायक ससाणे, बाळासाहेब दळवी, पाराजी दरेकर इतर उपस्थित होते.



# नगर शहरात वादळी पाऊस

## भिंत कोसळली, वाहनांचे नुकसान, विद्युत पोल, झाडे रस्त्यावर उन्मळून पडली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** रात्री साडेआठच्या सुमारास झालेल्या वादळी अवकाळी पावसाने नगर शहर व उपनगरात चांगलीच दाणादाण उडाली. सोसाट्याचा वारा आणि पाऊस यामुळे नुकसान झाले. सुमारे अर्धातास पाऊस पडला. या अर्धातासाच्या पावसाने अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली तर काही ठिकाणी वीजेचे खांब कोसळले. यामुळे वीज पुरवठा खंडीत झाला होता. खंडीत वीज पुरवठ्यामुळे नागरिकांना अंधारात रात्र जागून काढावी लागली आहे. या मोसमातील हा पहिलाच अवकाळी पाऊस पडला. हवामान खात्याने नगर जिल्ह्यात ३ जूनपर्यंत पावसाचा अलर्ट जारी केला आहे. दरम्यान, रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास नगर शहरात वादळी वाऱ्यासह पावसाला सुरूवात झाला. अचानक सुरू झालेल्या वादळी पावसाने नगरकरांची चांगलीच त्रेधातिरपीट उडाली. जोरदार वारे आणि पावसामुळे शहर व उपनगराच्या विविध भागात झाडे, उन्मळून पडण्याच्या, वीजेचे खांब पडल्याचे तसेच फ्लेक्स बोर्ड उडाल्याच्या घटना घडल्या. कोठला भकोसळून पडली. भागात वीजेची डिपी त्यामुळे परिसरातील वीज पुरवठा खंडीत झाला होता. मिस्किन मळा येथे भलेमोठे झाड रस्त्यावर पडले होते. वादळी वाऱ्याचा शहाराला फटका बसला. कोठी भागात पाटील हॉस्पिटलच्या बांधकामासाठी उभारण्यात आलेली परास शेजारील घरावर कोसळली. छत्रपती संभाजी नगर रोडवर झाडे पडली. विजेचे खांब पडले. यामुळे वाहतूक विस्कळीत झाली. शहराच्या बहुतांश भागातील वीज पुरवठा खंडीत झाला. काही वेळ आलेले जोरदार वादळ आणि हलक्या पावसाने शहराला मोठा फटका बसला आहे.

### शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

वादळी पावसाने रविवारी रात्री ८.३० ते आज (सोमवार) पहाटे ३.३० वाजेपर्यंत वीज पुरवठा खंडीत झाला होता. त्यामुळे पाणी उपसा बंद पडला. परिणामी पाणी वितरणासाठीच्या टाक्या भरता आल्या नाहीत. आज मंगलगेट, झेडीगेट, सर्जेपुरा, रामचंद्र खुंट, दाळमंडई, जुने कलेक्टर ऑफिस परिसर, हातमपूरा, धरतीचौक, बंगाल चौकी या भागासह गुलमोहर रोड, सिव्हील हडको, समता नगर, पंकज कॉलनी, लॉईड बिशप, प्रोफेसर कॉलनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टी.व्ही. सेंटर परिसर, म्युनिसीपल हाडको, बायजाबाई निर्मलनगर, शिवनगर, डोकेनगर, बालिकाश्रम रोड परिसर, मार्कंडेय, रामकृष्ण कॉलनी, सावेडी तसेच नागपूर बोल्हेगाव या भागाचा पाणी पुरवठा बंद राहिला. या भागास मंगळवारी पाणी पुरवठा करण्यात येईल. सिद्धार्थ नगर, दिल्लीगेट, नालेगाव, चितळे रोड, आनंदी बाजार, तोफखाना, जुने मनपा कार्यालय परिसर, पंचपीर चावडी, कापड बाजार खिस्त गल्ली या भागास मंगळवारऐवजी बुधवारी पाणी पुरवठा होईल, असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### आपत्कालीन परिस्थितीत संपर्क करण्याचे आवाहन

आपत्कालीन परिस्थितीत मनपाने सर्व विभाग तत्पर ठेवले आहेत. पाऊस, वादळ, पूर किंवा इतर कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत संबंधित विभागाशी त्वरीत संपर्क साधावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. बांधकाम, पाणी पुरवठा, उद्यान, घनकचरा व्यवस्थापन, अग्निशमन, विद्युत, आरोग्य, आपत्कालीन विभाग या विभागांचे फोन नंबर जारी करण्यात आले असून या विभागांशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आरक्षणाच्या नावाखाली जाती-जातींत संघर्ष पेटवण्याचे सरकारचे कारस्थान : डॉ. शिनगारे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** महाराष्ट्र सरकार आरक्षणाच्या मुद्द्यावरून विविध समाजघटकांमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम करत असून, समर्थक जातींना एकमेकांविरुद्ध उभे करण्याचे षडयंत्र राबवत आहे. समाजातील विविध प्रश्नांपासून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी जाती-जातींमध्ये संघर्ष, दंगली आणि वाद निर्माण करण्याचे कारस्थान सरकारकडून सुरू असल्याचा गंभीर आरोप अनुसूचित जाती उपवर्गीकरणाचे अभ्यासक डॉ. सिद्धार्थ शिनगारे यांनी केला.

अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी १० जूनपासून बीड येथून निघणाऱ्या राज्यव्यापी लाँग मार्च १५ जून रोजी अहिल्यानगर शहरात येणार आहे. त्याच्या नियोजनार्थ फुले-शाहू-आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. विजय भांबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत एन. एम. पवळे, पी. पी. खंडागळे, निवृत्ती आरु, राजीव साळवे, सुहास धीवर, संजय कांबळे, धम्मपाल विद्याधर यांच्यासह विविध संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीत बोलताना डॉ. शिनगारे यांनी सरकारच्या आरक्षण धोरणावर टीका करताना सांगितले की, एससी उपवर्गीकरणाचा मुद्दा पुढे आलेला असताना त्यामधील ५८ जाती या उपवर्गीकरणाच्या विरोधात आहे. एकाच जातीची मागणी असून, त्यामधील निम्मे लोक देखील याला विरोध दर्शवित आहे. आरक्षणावरुन विविध जातींना एकमेकांविरोधात उभे केले जात आहे. हे सर्व कारस्थान सरकारपक्षातील व्यक्तींकडूनच राबविले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. आरक्षणावरुन ओबीसी आणि मराठा समाजातील संघर्ष देखील सरकारने लावून दिला आहे. धनगर समाज आदिवासी प्रवर्गात समावेशाची मागणी करत असताना आदिवासी आणि धनगर समाजात संघर्ष निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे गंभीर आरोपही त्यांनी यावेळी केले.

# खोटा गुन्हा मागे घेऊन फिर्यादीवर कारवाई करा

## समस्त आंबेडकरी समाजाचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** पारनेर पोलीस ठाण्यात ३० मे २०२६ रोजी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते सुमेध गायकवाड यांचे नाव अन्यायकारकपणे व खोट्या पद्धतीने समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप करत, संबंधित गुन्ह्याची सखोल चौकशी करून तो मागे घ्यावा तसेच खोटी फिर्याद दाखल करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी समस्त आंबेडकरी समाजाच्यावतीने पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ आंबेडकरी नेते अशोक गायकवाड, नगरसेवक सुरेश बनसोडे, सुनील शेत्रे, सुनील शिंदे, किरण दाभाडे, अमित काळे, विशाल कांबळे, जी. डी. गायकवाड, अनिल काळे, किरण गायकवाड, गौतम म्हस्के, प्रतीक सोनवणे, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, सागर ठोकळ, सचिन शेलार, यशवंत भांबळ, सुनील हिवाळे, विलास साठे सर , प्रा जाधव सर , गौतमी भिंगारदिवे, विवेक विधाते, महेश भोसले, सागर ढगे, बाळासाहेब सूर्यवंशी, संजय साळवे, विशाल गायकवाड, दिलीप साळवे, सिद्धांत गायकवाड , संघराज गायकवाड , सुजन भिंगारदिवे, कृष्णा गाडे, राजेंद्र शिरसाट, सिद्धार्थ राजगुरु,पोपटराव पाथरे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच इतर महापुरुषांबाबत सोशल मीडियावर अवमानकारक मजकूर प्रसारित करून जातीय आणि धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी मंगेश बरकसे यांनी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मात्र, या फिर्यादीत सुमेध गायकवाड यांचे नाव नमूद करून त्यांच्यावर गंभीर व खोटे आरोप करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. सुमेध गायकवाड हे संबंधित घटनास्थळी उपस्थित नसतानाही त्यांचे नाव गुन्ह्यात गोवण्यात आले असून, यामुळे त्यांचे कुटुंबीय तसेच आंबेडकरी समाजामध्ये तीव्र नाराजी व संतापाची भावना निर्माण झाली आहे. खंडणीसारख्या गंभीर गुन्ह्यात विनाकारण नाव समाविष्ट करून त्यांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

# गोदावरी-कृष्णा खोरे कार्यालय स्थलांतराला कर्मचाऱ्यांचा तीव्र विरोध



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत विविध कार्यालयांच्या प्रस्तावित स्थलांतराच्या निर्णयाविरोधात मुळा पाटबंधारे जलसिंचन भवनातील कर्मचाऱ्यांनी कामबंद ठेऊन विरोध दर्शविला आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, अहिल्यानगर शाखेच्या वतीने स्थलांतराला विरोध दर्शविण्यासाठी सोमवारी (दि. १ जून) जलसिंचन भवनासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात जलसंपदा विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच कार्यालयांचे स्थलांतर तातडीने रद्द करण्यात यावे, अशी मागणी करणारे निवेदन मुख्यमंत्री यांना पाठविण्यात आले.

या आंदोलनात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस रावसाहेब निमसे, अध्यक्ष सुभाष तळेकर, उपाध्यक्ष अशोक मासाळ, विजय तोडमल, देविदास पाडेकर, वैशाली बोडखे, मृदुला भोर, उषा देवकाते, गंगासागर उगले, अनिता निकाळजे, अश्विनी कोंडा, शुभांगी लवांडे, पल्लवी सोनवणे, प्रतीक्षा औटी, स्नेहल राऊत, राधा चौधरी, संजीवनी गायकवाड, अश्विनी भगत, दीपा सातपुते, प्रियंका म्हस्के, शिल्पा ताजणे, पल्लवी तोडमल, अश्विनी देवराय, संगीता कार्ले, दीपक गीते, रवींद्र कोडम, रोहित निमसे, प्रसाद कराळे, प्रशांत आठरे, मनोज देशमुख, राजेश जाधव, संतोष गांगर्डे, किशोर गांगर्डे, कृष्णा आंधळे, आदिनाथ कराळे, रवींद्र तवळे, दत्ता सावरे, संतोष कासार, पोपट जायभाय, जालिंदर सुपेकर आदींसह जलसंपदा विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जलसंपदा विभागांतर्गत कार्यान्वित असलेल्या सर्व सिंचन महामंडळांच्या कामकाजावर शासन स्तरावरून नियंत्रण ठेवले जाते. महामंडळ स्तरावरील महत्त्वाचे निर्णय शासनाच्या मान्यतेनंतरच निर्गमित होत असतात. मात्र शासन व जलसंपदा विभागाची पूर्वमान्यता न घेता संबंधित महामंडळांकडून विविध कार्यालयांच्या स्थलांतराचे आदेश काढण्यात आल्याची बाब चिंताजनक असल्याचे संघटनेने नमूद केले आहे. संघटनेच्या मते, प्रस्तावित स्थलांतरामुळे प्रशासकीय कामकाजात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असून शेतकरी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी तसेच सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होणार आहे. अनेक वर्षांपासून कार्यरत असलेली कार्यालये अचानक अन्यत्र हलविणे हे कोणत्याही दृष्टीने योग्य नसल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. संघटनेने विशेषतः अहिल्यानगर पाटबंधारे विभाग आणि मुळा पाटबंधारे विभागाच्या स्थलांतरास विरोध दर्शविला आहे. अहिल्यानगर पाटबंधारे विभाग सन १९३० पासून अहिल्यानगर मुख्यालयात कार्यरत असून त्याचे लोणी (ता. राहाता) येथे स्थलांतर प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच सन १९७२ पासून कार्यरत असलेल्या मुळा पाटबंधारे विभागाचे मुख्यालय राहुरी येथे हलविण्याचा प्रस्ताव आहे.

या दोन्ही विभागीय कार्यालयांचे कामकाज जिल्हास्तरावरील प्रशासकीय नियंत्रणाशी संबंधित आहे. विभागांच्या कार्यक्षेत्रात उपविभागीय व शाखास्तरीय कार्यालये कार्यरत असल्यामुळे विविध तालुक्यांतील लाभधारक, शेतकरी व कर्मचारी यांच्यासाठी अहिल्यानगर मुख्यालय अधिक सोयीचे असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.




# पेट्रोल-डिझेल, गॅस दरवाढीविरोधात भाकपचे निदर्शने

## इंधन दरवाढीवर नियंत्रण ठेवण्याची केंद्र व राज्य सरकारकडे मागणी

**अहिल्यानगर :** पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या सतत वाढत असलेल्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान ढासळत असून महागाईच्या झळा प्रत्येक घटकाला बसत आहेत. या वाढत्या महागाईच्या निषेधार्थ तसेच केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी इंधन दरवाढ तातडीने कमी करावी आणि आवश्यक वस्तूंच्या किमतींवर नियंत्रण आणावे, अशी मागणी करण्यात आली.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सहसेक्रेटरी कॉ. ॲड. सुधीर टोकेकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात आयटकचे कॉ. सतीश पवार, कॉ. सुभाष ठुबे, सुभाष शिंदे, बाळासाहेब बहिरट, कन्हैया बुंदेले, प्रा. सुभाष कडलग, ज्ञानदेव गायकवाड यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते. देशभरात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या किमतींमध्ये सातत्याने वाढ होत असून त्याचा थेट परिणाम सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. इंधन हे जीवनावश्यक गरजांशी निगडित असल्याने त्याच्या दरवाढीचा परिणाम वाहतूक, शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण आणि घरगुती खर्च अशा सर्व क्षेत्रांवर होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. भाकपच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, सरकार नागरिकांना काटकसरीचा सल्ला देत असले तरी प्रत्यक्षात इंधनाच्या वाढत्या किमतींमुळे सामान्य माणसाचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडले आहे.

## थकीत वेतन, पीबीआय व बदलीच्या मागण्यांसाठी

# समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे अन्नत्याग आंदोलन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

### ऑनलाइन काम बंद; जिल्हा परिषद कार्यालयासमोर एकदिवसीय आंदोलन

**अहिल्यानगर :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेच्या वतीने जिल्हा परिषद कार्यालयासमोर एकदिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. यासोबतच समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी ऑनलाइन काम बंद आंदोलनही सुरू केले आहे.

संघटनेच्या वतीने तीन महिन्यांचे थकीत वेतन तातडीने अदा करावे, पाच महिन्यांपासून प्रलंबित असलेला कामावर आधारित मोबदला (झइख) द्यावा, जिल्हा अंतर्गत बदल्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात तसेच कोविड काळातील फरकाची रक्कम त्वरित अदा करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ. शैलेश पवार, उपजिल्हाध्यक्ष सूर्यकांत यादव, सचिव अक्षय जवरे, डॉ. प्रीती सैदोरे, डॉ. नूतन कडलग, डॉ. शितल चौधरी, प्रवीण राठोड, डॉ योगिता शेजाळ, डॉ सविता कुटे, डॉ वैष्णवी गोपालघरे,डॉ. दिनेश भोज, अक्षय अनाप, राम भवानी, विजय शिंदे, नाईकवाडे यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व समुदाय आरोग्य अधिकारी उपस्थित होते.



संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे डिसेंबर, जानेवारी, मार्च आणि एप्रिल महिन्यांचे कामावर आधारित मोबदला (झइख) तसेच मार्च आणि एप्रिल महिन्यांचे मूलभूत मानधन अद्याप प्रलंबित आहे. शासनाकडून पगार वितरणासाठी निधी उपलब्ध होऊनही वेतन वितरणाबाबत राज्य शासनाकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

जिल्हा परिषद अहिल्यानगरकडून वेतन वितरणासंदर्भातील आवश्यक माहिती राज्य शासनाकडे पाठविण्यात आली असतानाही अद्याप वेतन अदा करण्यात आलेले नाही. परिणामी, गेल्या अनेक महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून उपकेंद्रापर्यंत जाण्याचा खर्च भागविणेही कठीण झाले आहे, अशी खंत आंदोलकांनी व्यक्त केली.

प्रत्येक कर्मचारी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी काम करतो. मात्र वेळेवर मानधनच मिळत नसेल तर जगायचे कसे? असा सवाल उपस्थित करत संघटनेने शासनाने तातडीने मागण्यांची पूर्तता करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे. समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर तत्काळ निर्णय घेऊन थकीत वेतन, पीबीआय, कोविड काळातील फरकाची रक्कम आणि बदली प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

द • ख • ल

## पावसाळी वाहिनीत सांडपाणी; टोयोटा शोरूमला दंड

**वाघोली** : पुणे-अहिल्यानगर महामार्गालगत असलेल्या टोयोटा शोरूमकडून घाण सांडपाणी थेट पावसाळी वाहिनीमध्ये सोडण्यात येत असल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर पुणे महानगरपालिकेने संबंधित शोरूमवर ५० हजार रुपयांची दंडात्मक कारवाई केली आहे. तसेच पावसाळी गटार लाइनमध्ये सांडपाणी सोडणाऱ्या इतर व्यावसायिक आस्थापना व गृहनिर्माण संस्थांविरोधातही कठोर कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत नगर रोडलगत फुलमळा रोड, टोयोटा शोरूम, रॉबो सोसायटी तसेच इतर अनेक व्यावसायिक आस्थापनांकडून पावसाळी गटार लाइनमध्ये सांडपाणी व ड्रेनेजचे पाणी सोडले जात असल्याचे आढळून आले. त्यामुळे पावसाळ्यात गटारे तुंबणे, दुर्गंधी पसरणे, चेंबर ओव्हरफ्लो होणे आणि केसनंद रोड परिसरात घाण पाणी साचणे अशा समस्या निर्माण होत आहेत. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी संदीप सातव, येरवडा-नगर रोड क्षेत्रीय कार्यालयाचे आरोग्य निरीक्षक मिलिंद खानोडे, आरोग्य विभागाचे हनुमंत साळवी, अशोक क्षीरसागर, सुरेश उबाळे, दीपक वाघमारे, सागर वाघमारे तसेच इतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत वाघोली परिसरात विशेष मोहीम राबविण्यात आली. मोहिमेदरम्यान नगर रोडलगत पावसाळी गटार लाइनला बेकायदेशीरपणे जोडण्यात आलेले पाइप जेसीबीच्या साहाय्याने तोडण्यात आले. तसेच संबंधित व्यावसायिक आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. यावेळी प्रशासनाकडून पावसाळी गटार लाइनमध्ये सांडपाणी सोडू नये, अन्यथा कठोर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. वाघोली परिसरात पावसाळी गटार लाइनला घाण पाण्याची ड्रेनेज लाइन जोडल्यास संबंधितांविरोधात नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल, असे येरवडा-नगर रोड क्षेत्रीय कार्यालयाचे आरोग्य निरीक्षक मिलिंद खानोडे यांनी स्पष्ट केले.

## बळजबरीच्या विवाहासाठी तरुणाचे अपहरण; ७ जण अटकेत

**पुणे** : अष्टापूर फाटा येथून २९ वर्षीय तरुणाचे बळजबरीने लग्न लावून देण्याच्या उद्देशाने अपहरण करणाऱ्या सात जणांना आणि एका विधी संघर्षित बालकाला पुणे शहर पोलिसांनी अवघ्या चार तासांत माजलगाव येथून ताब्यात घेतले. या कारवाईत अपहृत निलेश लक्ष्मण बोद्रे (रा. शिंदेवाडी) याची सुखरूप सुटका करण्यात आली. पोलीस उपायुक्त (गुन्हे) विभागाच्या माहितीनुसार, २७ मे रोजी रात्री अष्टापूर फाटा येथील शिवनेरी मिसळसमोर एका कारमधून तरुणाचे अपहरण झाल्याची माहिती नियंत्रण कक्षामार्फत लोणीकंद पोलीस ठाण्याला प्राप्त झाली. माहिती मिळताच पोलीस पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक तपासात अज्ञात व्यक्तींनी निलेश बोद्रे याला मारहाण करून जबरदस्तीने कारमध्ये कोंडत पळवून नेल्याचे समोर आले. त्यानंतर लोणीकंद पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेच्या पथकांनी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण तसेच बीड, नांदेड आणि परभणी येथील पोलिसांच्या मदतीने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. कौशल्यपूर्ण तपासाच्या आधारे अवघ्या चार तासांत माजलगाव येथे आरोपींचा माग काढून त्यांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणात सुदाम मानिक ताठे (वय २३, रा. वजूर, परभणी), शेख सोहेल शेख अफसर (वय २१, रा. वालूर, परभणी), देवीदास भगवान पांजगे (वय २१, रा. प्रसादनगर, परभणी), वैभव मिलिंद शेळके (वय २२, रा. गंगाखेड रोड, परभणी), सारंग भगवानराव काकडे (वय ३३, रा. आष्टूर, नांदेड), प्रसाद बंडू गवळी (वय २७, रा. प्रसादनगर, परभणी) आणि सोनाली बालाजी निर्वाळ (वय २७, रा. भाग्यनगर, परभणी) यांना अटक करण्यात आली आहे. तसेच एका विधी संघर्षित बालकालाही ताब्यात घेण्यात आले आहे.

## जारकरवाडीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

**लोणी धामणी** : आंबेगाव तालुक्यातील जारकरवाडी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमाचे आयोजन




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी गावातील ग्रामपंचायत कार्यालय तसेच पांडुरंग मंदिर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या समाजहितकारी, लोककल्याणकारी आणि प्रेरणादायी कार्याचे स्मरण केले. कार्यक्रमास गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या आदर्श विचारांचे अनुसरण करून समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. जारकरवाडी ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जयंती सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी केली.

# अन्न व औषध प्रशासनाकडून आंबेगाव व खेड तालुक्यात ५ ठिकाणी धडक कारवाई

### कारवाईत १९ लाखाहून अधिक रकमेचा साठा जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच पुणे जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत आंबेगाव व खेड तालुक्यात ५ ठिकाणी धडक कारवाई करण्यात आली; यामध्ये १९ लाख ३ हजार ३७९ लाख रुपयाचा साठा जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती पुणे विभागाचे सहायक आयुक्त (अन्) दि.वा. भोगावडे यांनी दिली आहे.

आंबेगाव तालुक्यात मंचर येथे साईराज पान अँड टी हाऊस व समीक्षा कोल्ड्रिंक जनरल अँड किराणा स्टोअर यांच्या पाठीमागील छोट्या गोदामामध्ये दोन ठिकाणी ३० हजार ३९५ रुपयाचा गुटखा, पानमसाला व इतर तत्सम प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री करत असल्याचे आढळून आले. संबंधितावर भारतीय न्याय संहिता, २०२३ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नुसार पोलीस स्टेशन, मंचर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंचर येथे खेमराज फूड इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड ही आस्थापना विनापरवाना नोंदणी व्यवसाय करत असल्याचे आढळून आले. तसेच येथे विक्रीसाठी ठेवण्यात आलेला मैदा, बेसन, आटा व इतर अन्नपदार्थ असा १९ हजार ८८६ किलोचा १० लाख ४९ हजार ३६४ रुपये किमतीचा साठा नमुना विश्लेषणासाठी घेऊन जप्त करण्यात आला.

खेड तालुक्यातील खालची भांबुरवाडी येथील उज्वल सुपारी ही आस्थापना विनापरवाना, नोंदणी व्यवसाय करत असल्याचे आढळून आले. या आस्थापनेत विक्रीसाठी ठेवण्यात आलेली सुपारी ही अप्रमाणित अथवा असुरक्षित असल्याच्या संशयावरून १ हजार ८९८ किलो वजनाचा आणि ८ लाख १६ हजार १४० रुपयाचा साठा जप्त करण्यात आला.

नरे येथील ओम साई फरसाण या आस्थापनेची तपासणीदरम्यान फाईड ग्रीन वाटाणा या अन्नपदार्थांमध्ये कृत्रिम रंगाचा वापर करत असल्याचे आढळून आले. त्या अनुषंगाने फाईड ग्रीन वाटाणा या अन्न पदार्थाचे व यात वापरला जाणारा कृत्रिम रंगाचे नमुने तपासणीसाठी घेऊन ६८ किलो असे ७ हजार ४८० रुपयाचा साठा भेसळीच्या संशयावरून जप्त करण्यात आला.

या कारवाईत अन्न सुरक्षा अधिकारी स्वाती मरके, सुप्रिया जगताप, संतोष सावंत, सतीश हाके, प्रकाश कचवे, लक्ष्मीकात साळवे, अभिजीत झोडगे, आदित्य जोशी, सकेत सूर्यवंशी व नमुना सहाय्यक श्री. साळवे याच्या पथकाने या कार्यक्षेत्राचे सहाय्यक आयुक्त (अन्न) श्री. नारायण सरकटे प्रदीप आंबरे यांच्या उपस्थितीत व पुणे विभागाचे सह आयुक्त (अन्न) श्री.दि.वा. भोगावडे यांच्या निर्देशान्वये पार पडली. अन्न व औषध प्रशासनामार्फत ग्राहकाच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या तसेच निकृष्ट भेसळयुक्त व बेकायदेशीर अन्न उत्पादन करणाऱ्या आस्थापनाविरुद्ध अशा मोहिमा सुरूच राहणार असून नागरिकानी याबाबतची माहिती प्रशासनास उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात येत आहे.

## लाडकी बहीण योजनेतील अपात्र लाभार्थ्यांवरील खर्चाची चौकशी करा : काँग्रेसची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील सुमारे ८१ लाख लाभार्थी अपात्र ठरल्याच्या पार्श्वभूमीवर या लाभार्थ्यांना वितरित करण्यात आलेल्या सरकारी निधीची जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केली आहे.

यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत तिवारी म्हणाले की, विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरू करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत पात्रता पडताळणी न करता लाभार्थ्यांना दरमहा १,५०० रुपये अनुदान मंजूर करून वितरित करण्यात आले. आता महिला व बालविकास विभाग तसेच अर्थ विभागाकडून सुमारे ८१ लाख अर्जदार अपात्र ठरविण्यात आले आहेत. त्यामुळे अपात्र लाभार्थ्यांना निधी वितरित होईपर्यंत प्रशासनाला ही बाब का लक्षात आली नाही, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. अपात्र लाभार्थ्यांची नावे वगळल्यानंतर राज्य शासनाची दरमहा सुमारे १,२०० कोटी रुपयांची बचत होणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यानुसार आतापर्यंत राज्याच्या तिजोरीवर अंदाजे १८ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडल्याचा दावा तिवारी यांनी केला. या खर्चाची कायदेशीर आणि प्रशासकीय जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. राज्यातील प्रशासनाने संविधान आणि कायद्याच्या चौकटीत राहून निर्णय घेणे अपेक्षित असताना पात्रता निकषांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप त्यांनी केला. संबंधित सनदी अधिकारी, सचिव आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करून सरकारी निधीची वसुली करण्यात यावी, असेही त्यांनी म्हटले. तिवारी यांनी पुढे सांगितले की, योजनेत सुमारे १२ हजार ६५ वर्षांवरील व्यक्ती तसेच सुमारे १५ हजार सरकारी कर्मचारी लाभार्थी म्हणून समाविष्ट झाल्याचे समोर आले आहे. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अशा अपात्र लाभार्थ्यांची माहिती प्रशासनाला मिळत असेल, तर ही बाब गंभीर असून संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. ाज्य सरकारच्या धोरणांवर टीका करताना त्यांनी वाढती गुन्हेगारी, आर्थिक भार आणि प्रशासनातील कथित त्रुटींसाठी सरकारला जबाबदार धरले. तसेच महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव, राज्यपाल आणि आवश्यक असल्यास उच्च न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेऊन चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली.अपात्र लाभार्थ्यांना निधी वाटपासाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची नावे जाहीर करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा काँग्रेस कार्यकर्ते आंदोलन छेडतील, असा इशाराही तिवारी यांनी दिला.

## अपघात नव्हे तर जिवे मारण्याचा प्रयत्न; पीडित कुटुंबाची आरोपींवर कठोर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती**: बारामती तालुक्यातील मासाळवाडी येथील रहिवासी सुनील लालासाहेब मासाळ यांनी वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्याकडे दिलेल्या तक्रारीत, आपल्यावर आणि कुटुंबीयांवर नियोजनबद्ध पद्धतीने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याचा आरोप करत संबंधित आरोपींवर भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ अन्वये जिवे मारण्याच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.




तक्रारीनुसार, सुनील मासाळ यांचे गावातील काही व्यक्तींशी शेतजमिनीच्या कारणावरून वाद सुरू आहेत. २७ मे २०२६ रोजी सकाळी सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास आरोपींनी शिवीगाळ व मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यानंतर तक्रार देण्यासाठी मोटारसायकलवरून जात असताना आरोपींनी चारचाकी वाहनातून पाठलाग करून मोटारसायकलला पाठीमागून जोरदार धडक दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या अपघातात सुनील मासाळ यांना हात, पाय तसेच शरीराच्या विविध भागांना गंभीर दुखापती झाल्या असून त्यांच्या भावालाही दुखापत झाली आहे. घटनेनंतर जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, संबंधित पोलीस ठाण्यात या घटनेची केवळ अपघात म्हणून नोंद करण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, हा केवळ अपघात नसून आरोपींनी पूर्वनियोजित कट रचून जिवे मारण्याच्या उद्देशाने वाहनाची धडक दिली. त्यामुळे संबंधित आरोपींवर भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना तातडीने अटक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलीस प्रशासन या तक्रारीची चौकशी करून पुढील कायदेशीर कारवाई करणार असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, पीडित कुटुंबाने न्याय मिळावा आणि आरोपींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी केली आहे.

## श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर १५ जुन पासुन होणार दर्शनासाठी खुले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर** : पुणे जिल्ह्यातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराबाबत भाविकांसाठी आनंदाची बातमी आहे. मंदिर येत्या १५ जून २०२६ पासून दर्शनासाठी पुन्हा खुले होणार असल्याची माहिती प्रभारी जिल्हाधिकारी गजानन पाटील यांनी दिली आहे. नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर परिसरात विविध विकासकामे आणि भाविकांसाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे काम गेल्या काही महिन्यांपासून सुरू होते. मंदिरासमोरील नवीन सभामंडप, पायरी मार्ग, दर्शन रांग व्यवस्था तसेच इतर पायाभूत सुविधांच्या कामामुळे ९ जानेवारी २०२६ पासून मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्यात आले होते. या कालावधीत सभामंडप उभारणी, परिसर सुशोभीकरण, स्वच्छता, सुरक्षितता आणि गर्दी व्यवस्थापनाची कामे वेगाने पूर्ण करण्यात आली. देवस्थान ट्रस्ट, प्रशासन, ग्रामस्थ आणि भाविकांच्या सहकार्यामुळे अवघ्या पाच महिन्यांत ही कामे अंतिम टप्प्यात पोहोचली आहेत. भाविकांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, विश्रांती



सुविधा, नियोजित दर्शन रांगा तसेच आपत्कालीन सेवांची व्यवस्था करण्यात आली आहे. गर्दीच्या काळात ऑनलाइन दर्शन नोंदणी आणि दर्शन व्यवस्थापनासाठी आधुनिक तांत्रिक सुविधांचाही वापर केला जाणार आहे. दरम्यान, लाखो भाविकांच्या स्वागतासाठी भीमाशंकर सज्ज असून, प्रशासनाने सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## पारगाव शिंगवे येथे मोफत आरोग्य तपासणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगवे पारगाव** : गजानन क्लिनिक, पारगाव शिंगवे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरामध्ये १२५ नागरिकांनी सहभाग नोंदवून विविध आरोग्य तपासण्या करून घेतल्या.



शिबिरात वजन व रक्तदाब (बीपी) तपासणी, रक्तातील साखरेची तपासणी, हिमोग्लोबिन (एचबी) तपासणी, रक्तदाब व मधुमेहाविषयी जीवनशैली समुपदेशन, सर्वसाधारण आरोग्य तपासणी तसेच विविध आजारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. महिलांमधील वंध्यत्व, पीसीओडी, पीसीओएस, मासिक पाळीतील समस्या, गर्भाशयाशी संबंधित आजार, अंगावरून जाणे यांसह विविध स्त्रीरोगांबाबत सल्ला देण्यात आला.

याशिवाय हृदयविकार, श्वसनविकार, छातीचे विकार, पचनसंस्था, मूत्रविकार, मान, पाठ व कंबरदुखी, खांदेदुखी, सांधेदुखी, संधिवात, गुडघेदुखी, थकवा, अशक्तपणा, हात-पायांना मुंग्या येणे, सायटिका, सर्दी, घसादुखी, अंगदुखी आदी सर्वसाधारण आजारांवर तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. आहार, पोषण, आरोग्य व तंदुरुस्तीबाबतही समुपदेशन करण्यात आले. आवश्यकतेनुसार वैद्यकीय प्रयोगशाळा तपासण्या, रक्त तपासणी, सोनोग्राफी व एक्स-रे सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या.

शिबिरात हृदयविकार, रक्तदाब, मधुमेह, पोटविकार व किडनीविकार तज्ज्ञ डॉ. सदानंद राऊत, जनरल सर्जन डॉ. टी. जी. गोरडे, एमबीबीएस डॉ. सुजाता गोरडे, जनरल फिजिशियन डॉ. वसंत गोरडे, जनरल फिजिशियन डॉ. जे. एस. वाजे, डॉ. मकरंद घोरपडे तसेच जनरल फिजिशियन डॉ. संदीप गोसावी आणि जनरल फिजिशियन डॉ. राजेश धुमाळ उपस्थित होते. उपस्थित तज्ज्ञांनी नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करून आवश्यक उपचार व औषधोपचाराबाबत सल्ला दिला.

## शासकीय वसतीगृहात प्रवेशाकरिता वेळापत्रक जाहीर ३० जून पासून प्रवेश प्रक्रियेस सुरुवात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता शासकीय वसतिगृह प्रवेश हे ऑनलाईन पध्दतीने होणार असून इयत्ता ११ वी, १२ वी आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे वसतिगृह प्रवेशाचे अर्ज र्हीींिं://हारी.ारहरश्रीं.ॲस. या संकेतस्थळावर स्वीकारण्यात येणार आहे. याबाबतचे शासकीय वसतीगृहात प्रवेशाकरिता निर्गमित करण्यात आलेल्या वेळापत्रकाचा विचार करुन विहीत कालावधीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण विशाल लोंढे यांनी केले आहे.

वसतिगृह प्रवेशासाठी अनुक्रमे अर्ज करण्याची मुदत व कंसामध्ये प्रवेशाची यादी प्रसिध्द करावयाचा दिनांक पुढीलप्रमाणे शालेय विद्यार्थी ३० जून (७ जुलै), इयत्ता ११ वी व १२ वी तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता विद्यार्थ्याकरिता १५ जुलै (३१ जुलै) असा आहे. जिल्ह्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागांतर्गत एकूण २६ मागासवर्गीय मुलां-मुलींची शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. त्यामध्ये १५ मुलांची व ११ मुलींची आहेत. पुणे व पिंपरी-चिंचवड शहरामध्ये एकूण १४ शासकीय वसतिगृहे असून त्यापैकी मुलांची ९ व मुलींची ५ वसतिगृहे आहेत. तसेच १२ शासकीय वसतिगृहे ही तालुकास्तरावर आहेत.. तरी इच्छूक पात्र विद्यार्थ्यांनी या शासकीय वसतिगृह प्रवेश योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. लोंढे यांनी केले आहे.

## पुणे जिल्ह्यातील धरणांत ३० टीएमसी पाणीसाठा उन्हाळी आवर्तनामुळे वापर वाढला

पुणे : वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील धरणांमधील पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत असून, उन्हाळी आवर्तनामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर झाला आहे. सध्या जिल्ह्यातील धरणांमध्ये सुमारे ३०.४८ टक्के म्हणजेच जवळपास १५ टीएमसी पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती जलसंपदा विभागाने दिली. पुढील काही दिवस शेतकऱ्यांनी पाण्याचे काटेकोर नियोजन केल्यास संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता कमी राहू शकते, असा अंदाजही विभागाने व्यक्त केला आहे. जिल्ह्यात एकूण २६ धरणे असून, त्यांची एकत्रित उपयुक्त साठवण क्षमता १९८.३४ टीएमसी इतकी आहे. मागील वर्षी पावसाळ्यानंतर धरणांमध्ये तब्बल २०२.६७ टीएमसी (१०२ टक्के) इतका विक्रमी साठा नोंदविण्यात आला होता. मात्र, गेल्या सात महिन्यांतील पाणीवापरामुळे साठ्यात घट झाली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत धरणांमध्ये २१.१३ टीएमसी म्हणजेच सुमारे १० टक्के पाणी उपलब्ध होते. त्यामुळे यंदा तुलनेने अधिक पाणीसाठा उपलब्ध असल्याचे चित्र आहे.

**धरणनिहाय असलेला पाणीसाठा, टीएमसीमध्ये :**
**टेमघर ०.००, वरसगाव २.७७, पानशेत ३.०९, खडकवासला १.१२, पवना २.३६, कासारसाई ०.१६, कळमोडी ०.६८, चासकमान ०.८८, भामा आसखेड २.४९, आंद्रा १.०४, वडिवळे ०.५३, शेटफळ ०.१७, नाझरे ०.०६, गुंजवणी ०.७४, भाटघर १.८७, निरा देवघर २.५४, वीर ४.७९, पिंपळगाव जोगे ०.५४, माणिकडोह ०.६१, येडगाव १.०५, वडज ०.४१, डिंभे १.७८, चिल्हेवाडी ०.४९, घोड ०.१७, विसापूर ०.११, उजनी उणे ९.८७, मुळशी ४.८३**

**सात धरणांतून कालव्यांना विसर्ग सुरू :** उन्हाळी पिकांना आवश्यक पाणीपुरवठा करण्यासाठी चालू महिन्यापासून विविध धरणांतून आवर्तन सुरू करण्यात आले आहे. याचा फायदा आंबेगाव, शिरूर, खेड, इंदापूर, बारामती, दौंड आणि पुरंदर तालुक्यांतील शेतकऱ्यांना होत आहे. सध्या खडकवासला, चासकमान, वीर, पिंपळगाव जोगे, डिंभे आणि उजनी या धरणांतून डावे-उजवे कालवे तसेच बंद जलवाहिनीद्वारे पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे धरणांतील पाणीपातळी हळूहळू कमी होत आहे. जलसंपदा विभागाच्या मते, सध्या पाणीसाठा समाधानकारक असला तरी आगामी काळात तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाण्याची मागणी आणखी वाढून धरणांतील साठा झपाट्याने घटू शकतो. परिणामी शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम आणि नियोजनबद्ध वापर करणे आवश्यक असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

## सासवड आगाराकडुन एस टी चा वाढदिवस साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस** : स्थानकात फुलांची केलेली आकर्षक सजावट, लालपरीची ठेवण्यात आलेली सुंदर प्रतिकृती, एस टी च्या प्रवाशांच्या सेवेसाठी ब्रीद असलेली सुंदर रांगोळी, केक कापून, प्रवाशांना गुलाबपुष्प देत पेढे व साखर वाटून, मान्यवरांची एस टी मधून आगारात फेरी अशा स्वरूपात सासवड एस टी आगाराने १ जून हा एस टी चा ७८ वा वाढदिवस आज मोठया उत्साहात साजरा केला . माजी आमदार संजय जगताप, आगार प्रमुख मोहिनी ढेरे, पुरंदर मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ प्रवीण जगताप, स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठान चे अध्यक्ष संतोष जगताप, सचिव हेमंत ताकवले, भाजप जिल्हा उपाध्यक्ष संदीप देवकर यांसह अनेक मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने व वाचन चळवळीला



प्रेरणा देणाऱ्या एका मोफत वाचनालयाचे उद्घाटन देखील यावेळी करण्यात आले.

आगारप्रमुख मोहिनी ढेरे यांनी प्रास्तविकातुन सासवड आगारच्या विकासाची, सोयीसुविधाची माहिती दिली. संतोष जगताप, हेमंत ताकवले यांनीही शुभेच्छा व्यक्त केल्या. महाराष्ट्राच्या सर्व सामान्यांची जीवनवाहिनी बनून राहीलेल्या एस टी च्या विकासासाठी नागरिकांनी पुढे यावे असे आवाहन संजय जगताप यांनी केले. पोपट जैनक यांनी सूत्रसंचालन केले तर कैलास जगताप यांनी आभार मानले. लेखाकार मनीषा खोपडे, प्रतीक्षा यादव यांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रवीण गायकवाड, सुनील येळे, अमित वाल्मिकी, सावता जगताप, महेश भोंगळे, शशिकांत चव्हाण, विजय कोलते,गणेश भुजबळ, छाया पवार, संपूर्णानंद नाझरे, संगीता भागवत, गुलाब सोनावणे, प्रकाश मोरे यांसह एस टी कर्मचारी, प्रवाशी मोठया संख्येने यावेळी उपस्थित होते.

## ओतूर पोलिसांची तत्परता: हिमाचल प्रदेशमधून बेपत्ता महिला सुखरूप ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा** : ओतूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत घरगुती किरकोळ वादातून बेपत्ता झालेल्या ३३ वर्षीय महिलेचा शोध घेऊन तिला हिमाचल प्रदेशमधून सुखरूप ताब्यात घेण्यात ओतूर पोलिसांना यश आले आहे.

ओतूर पोलीस स्टेशन हरवलेल्या प्रमाणे सदर महिलेची नोंद करण्यात आली होती. बेपत्ता महिलेचा शोध घेत असताना पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची दिशा ठरवली. यातून ती महिला हिमाचल प्रदेश, शिमला जिल्ह्यातील बद्दी येथे असल्याचे उघड झाले.

पोलीसांनी दिलेल्या माहिती नुसार पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक शुभम कुमार, जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील, ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने पथक रवाना करण्यात आले. पोलीस हवालदार दिनेश साबळे,अतुल भेके यांनी नातेवाईकांसोबत बद्दी येथे जाऊन महिलेस ताब्यात घेतले. त्यानंतर तिला ओतूर येथे आणून नातेवाईकांच्या ताब्यात सुखरूप देण्यात आले. अवघ्या काही दिवसांत तांत्रिक तपास व समन्वयातून हरवलेल्या महिलेचा शोध लावल्याने ओतूर पोलिसांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# टाकळी काझीत रास्ता रोको आंदोलन

## अधिकारी-ठेकेदारांच्या मनमानीविरोधात ग्रामस्थांचा एल्गार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**चिचोंडी पाटील :** नगर तालुक्यातील टाकळी काझी येथे टाकळी काझी-उक्कडगाव-शिराढोण या महत्त्वाच्या रस्त्याचे काम मुदत संपूनही अपूर्ण राहिल्याने संतप्त ग्रामस्थांनी रस्ता रोको आंदोलन करत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी उक्कडगावचे मा. सरपंच नवनाथ मस्के यांनी संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांच्या ढिसाळ कारभारावर जोरदार टीका केली.

या रस्त्याच्या विकासासाठी तत्कालीन आ. बबनराव पाचपुते यांच्या प्रयत्नातून २०२३ मध्ये तब्बल ६.५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.

### मुदत संपूनही ६.५ कोटींच्या रस्त्याचे काम रखडले

त्यानंतर विद्यमान आ. विक्रमसिंह पाचपुते यांनीही सातत्याने पाठपुरावा करून कामाला गती देण्याचा प्रयत्न केला. मात्र अधिकारी व ठेकेदारांच्या मनमानी कारभारामुळे कामाची मुदत संपूनही रस्ता पूर्ण होऊ शकला नाही.

जनतेच्या सुविधांसाठी मंजूर झालेला निधी आणि विकासकामे जर केवळ कागदावरच राहणार असतील, तर आंदोलनाशिवाय पर्याय उरत नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया नवनाथ मस्के यांनी व्यक्त केली. आंदोलनादरम्यान ग्रामस्थांनीही संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारत तीव्र नाराजी नोंदवली.

ग्रामस्थांच्या आक्रमक भूमिकेनंतर संबंधित अधिकाऱ्यांनी उद्यापासून टाकळी काझी-उक्कडगाव-शिराढोण रस्त्याचे काम प्रत्यक्ष सुरू करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

मात्र, कामात झालेल्या विलंबासाठी संबंधित ठेकेदारावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करून तसेच पहिले अंदाज



पत्रक व निविदाशर्त ३८ नुसार वाढवलेले अंदाज पत्रकाची आधिकार्यावर जबाबदारी निशचित करुण कारवाई व्हावी. अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

रखडलेल्या विकासकामांमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांच्या या आंदोलनाने प्रशासन आणि ठेकेदारांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले असून, दिलेल्या आश्वासनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते का, याकडे आता परिसराचे लक्ष लागले आहे.

यावेळी टाकळी काझीचे सरपंच अशोक ढगे, उपसरपंच हर्षेल कांबळे, माजी उपसरपंच अविनाश पवार, सावंत गुरुजी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# द·ख·ल

## यश फौंडेशन वाचनालय येथे अहिल्याबाई होळकर जयंती साजरी



**ढोरजळगांव :** यश फौंडेशन लायब्ररी, जोहरपूर येथील वनेश्वर हनुमान वस्तीमध्ये पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन यश फौंडेशन लायब्ररीच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमात तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा गौरवपूर्ण इतिहास उलगडून सांगितला. समाजकल्याण, न्यायप्रिय प्रशासन, धर्मसंवर्धन व लोकहिताची कामे यांमुळे अहिल्याबाई होळकर यांचे नाव इतिहासात अजरामर झाल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास परिसरातील नागरिक, युवक, महिला तसेच यश फाउंडेशन लायब्ररीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे वातावरण भक्तिमय व प्रेरणादायी झाले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यश फाउंडेशन लायब्ररीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## श्रीगोंदा भूमिअभिलेख कार्यालयात नागरिकांचे हेलपाटे ; अधिकारी गायब


**श्रीगोंदा :** तालुक्यातील भूमिअभिलेख कार्यालयाचा कारभार सध्या पूर्णपणे ढेपाळल्याचे चित्र पाहायला मिळत असून नागरिक अक्षरशः हेलपाटे मारून त्रस्त झाले आहेत. उपअधीक्षक अविनाश मिसाळ हे अनेकदा कार्यालयात उपलब्ध नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. अधिकारी मिळत नसल्याने सामान्य नागरिकांना कामासाठी वारंवार चकरा माराव्या लागत असून दाद मागायची तरी कोणाकडे? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहेफ विशेष म्हणजे कार्यालयातील काही खाजगी कर्मचारीच संगणक प्रणाली व जुने रेकॉर्ड हाताळत असल्याची जोरदार चर्चा परिसरात सुरू आहे. शासनाच्या महत्त्वाच्या नोंदी खासगी व्यक्तींकडे कशा काय दिल्या जातात? असा प्रश्नही आता उपस्थित होऊ लागला आहे. कार्यालयावर नेमका कंट्रोल कोणाचा? अशी चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. मोजणीसाठी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना महिनोनमहिने तारखा मिळत नसल्याने मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. काही शेतकरी अनेक वेळा कार्यालयाच्या चकरा मारूनही रिकाम्या हाताने परतत असल्याचे चित्र आहे. मोजणीची तारीख मिळणं म्हणजे आता लॉटरी लागण्यासारखं झालंय, अशी उपरोधिक प्रतिक्रिया एका नागरिकाने दिली. दप्तरबंद, आकारबंद, शेतपुस्तक, मोजणी प्रकरणाच्या क-प्रत तसेच इतर नकला वेळेत मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ऑनलाइन युगात अजूनही लोकांना फाईल शोधण्यासाठी धावपळ करावी लागत असल्याने कार्यालयीन कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, नागरिकांच्या तक्रारी वाढत असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन भूमिअभिलेख कार्यालयाच्या कामकाजाची चौकशी करावी, संबंधितांवर कारवाई करावी तसेच नागरिकांना वेळेत सेवा मिळेल यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## श्रीगोंदा भूमिअभिलेख कार्यालयात नागरिकांचे हेलपाटे ; अधिकारी गायब



**श्रीगोंदा :** शिराळ चिचोंडी लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१व्या जयंती शिराळयेथे उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अहिल्यादेवीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पणकरून अभिवादन करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीनेझाली उपस्थितच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले त्यांच्या लोककल्याणकारी कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाज हिताचेकार्य करण्याचा संकल्पही ग्रामस्थांनी व्यक्त केला. धनगर समाजाच्या वतीने भव्य दिव्य वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली तसेच लहान मुलांचे यावेळी भाषणे झाली. या कार्यक्रमाला गावातील ग्रामस्थ व तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रो कबड्डी लीग पर्वसाठी आर्यन अशोक ढवळे याची तेलगू टायटन्स संघात निवड



**निघोज :** प्रो कबड्डी लीग पर्व १३ व १४ साठी निघोज येथील आर्यन अशोक ढवळे महाराष्ट्रामधील पहिला न्यू यंग प्लेअर ठरला असून त्याची तेलगू टायटन्स संघात निवड झाल्याबद्दल मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट वतीने ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद तसेच ट्रस्टचे सचिव शांताराम कळसकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त व माजी सरपंच ठकाराम लंके, बाबासाहेब कवाद, निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे ज्येष्ठ संचालक भिवाजी रसाळ, रमेश ढवळे, बाळासाहेब लंके, ड. ज्ञानेश्वर लामखडे, शंकरराव लामखडे, अनिल लंके, अशोकराव वरखडे, बबनराव ससाणे, संदीप वराळ, ट्रस्ट सल्लागार राजेंद्र ढवळे, उत्तमराव लामखडे, डॉ. निवृत्ती पानमंद, विलासराव हारदे उपस्थित होते. ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद यावेळी म्हणाले आर्यन ढवळे याने कब्बडी स्पर्धेत मोठा नावलौकिक मिळवून गावचा नावलौकिक राज्यात केला आहे. घरातच कब्बडीचे चांगले मार्गदर्शन मिळाल्याचा फायदा आर्यन याला मिळाला आहे. ट्रस्ट सचिव शांताराम कळसकर यावेळी म्हणाले निघोज येथील व्यवसायीक अशोक ढवळे हे एक उत्कृष्ट कब्बडीपटू आहेत. आर्यन याला ढवळे पती पत्नींचे मार्गदर्शन मिळाले म्हणून त्याला राज्य स्पर्धेत तसेच आंतरदेशीय स्पर्धेत खेळण्याची संधी मिळाली. या संधीचे सोने करुन तो एक आंतरराष्ट्रीय कब्बडीपटू होईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवा नेते उत्तमराव लामखडे, विश्वस्त अनिल लंके, ट्रस्ट व्यवस्थापक महेश ढवळे यांनी केले. विश्वस्त बाळासाहेब लंके व ड ज्ञानेश्वर लामखडे यांनी आभार मानले.

---

# सुसंस्कारानेच नवीन पिढी घडते : अकोलकर

## ३८ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** संस्कारांची शिदोरी आयुष्यभर सोबत ठेवल्यास आदर्श आणि सुसंस्कृत नवीन पिढी घडते, असे प्रतिपादन आदर्श शिक्षिका सौ. कालावती मोहनराव अकोलकर यांनी केले.

करंजी येथील श्री नवनाथ विद्यालयात सन १९८८ मध्ये इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा तब्बल ३८ वर्षांनंतर स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. यावेळी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एम एन मचे होते. याप्रसंगी साहेबराव शिंदे, श्रीमती सुंदर खुडे यांच्यासह अनेक शिक्षक उपस्थित होते.

यावेळी बोलताना सौ. अकोलकर म्हणाल्या की, शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असलेले संस्कारही शिक्षकांकडून दिले जातात. जीवनात कोणी मोठ्या पदावर गेले किंवा विविध क्षेत्रांत यश संपादन केले, तरीही संस्कारांचे महत्त्व कायम राहते. हे संस्कार आपण स्वतः जपत



आपल्या मुलांनाही दिल्यास सुसंस्कृत समाज आणि आदर्श भारत घडण्यास निश्चितच मदत होईल.

सुंदर खुडे यांनी विद्यार्थ्यांनी आयुष्यभर शिकत राहण्याची गरज अधोरेखित केली. समाजाशी आणि सामान्य माणसांशी नाळ जोडून ठेवल्यास जीवनाचा खरा आनंद अनुभवता येतो, असे त्या म्हणाल्या.

या स्नेहमेळाव्यास सुमारे ६५ माजी विद्यार्थी उपस्थित होते. ३८ वर्षांनंतर वर्गमित्र आणि मैत्रिणी पुन्हा भेटल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. एकमेकांची विचारपूस करत सुख-दुःखाच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. भविष्यातही असेच स्नेहबंध कायम ठेवण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजन समितीचे सदस्य दै. सकाळचे पत्रकार तुळशिदास मुखेकर, मायंजी बाबा देवस्थान अध्यक्ष बाबा मोरे, सोन्या चांदीचे व्यापारी प्रमोद दीक्षित, मच्छिंद्र कोलकर, अनिल अकोलकर आदींनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करून आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय कारखेले यांनी केले प्रास्ताविक तुळशीदास मुखेकर यांनी तर आभार बाबा मोरे, विठ्ठल मुटकुळे यांनी मांनले.

---

# शेवगावच्या ढाकणे शैक्षणिक संकुलात मेगा ओपन कॅम्पस ड्राइव्ह २०२६ ला अभूतपूर्व प्रतिसाद



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान, संगमनेर संचलित ढाकणे शैक्षणिक संकुल, शेवगाव अंतर्गत समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, डिप्लोमा इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) महाविद्यालय, सुनिताताई एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट तसेच समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ ढाकणे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मेगा ओपन कॅम्पस ड्राइव्ह २०२६ ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या भव्य रोजगार मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदविला. कॅम्पस ड्राइव्हमध्ये इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थ्यांची मुलाखत व निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये खढख विभागातील १११ व इंजिनिअरिंग विभागातील ११७ अशा एकूण २२८ विद्यार्थ्यांची निवड विविध नामांकित उद्योगांमध्ये करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या उद्योगांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या संस्थेच्या ध्येयाला या उपक्रमामुळे मोठे यश मिळाले आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. एकनाथरावजी ढाकणे साहेब, उपाध्यक्ष श्रीकांत ढाकणे, कोषाध्यक्ष हृषीकेश ढाकणे, संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक व पालक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---


# कर्जत शहरासह तालुक्याला अवकाळी पावसाने झोडपले

## ११ घरांचे नुकसान : वीजेच्या धक्क्याने गाईचा मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** कर्जत शहर आणि तालुक्यातील बहुतांश महसुली मंडळ क्षेत्रात रविवारी संध्याकाळी वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाटात तब्बल अर्धा तास अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. यात कर्जत मंडळात सर्वाधिक ३२ मिमी पावसाची नोंद झाली. तर मिरजगाव आणि खेड निरंक राहिले. रविवारच्या या अवकाळी पावसाने ११ घरांचे अंशतः नुकसान झाले असून खंडाळा (ता.कर्जत) येथे वीज पडल्याने गायीचा मृत्यु झाला असल्याची माहिती तहसीलदार रवी सतवन यांनी दिली.

रविवार, दि ३१ रोजी सकाळपासूनच कमालीचा उकाडा जाणवत असताना संध्याकाळच्या सुमारास ढगाळ वातावरण निर्माण झाले. संध्याकाळी साडे आठ वाजता अचानक सुसाट्याचा वारा सुटत वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाटात पावसाळा



सुरुवात झाली. तब्बल अर्धा तास कर्जत शहरासह तालुक्यातील इतर महसुली मंडळात अवकाळी पावसाने हजेरी लावली. या अवकाळी पावसाने मुळेवाडी, गुरव-पिंपरी, रुई-गव्हाण, खांडवी, चिंचोली रमजान, आळसुंदे, बर्गे वाडी आणि कोपर्डी येथील एकूण ११ घरांचे पडझड होत अंशतः नुकसान झाले असल्याची माहिती कर्जतचे तहसीलदार रवी सतवन यांनी दिली. यासह खंडाळा (ता. कर्जत) येथील पशुपालकांची गाय वीज पडून मृत्युमुखी पडली. तसेच चापडगाव, तळवडी, निमगाव डाकू, भांबोरा, देशमुखवाडी आणि रुईगव्हाण या ६ गावातील १५४ शेतकऱ्यांचे डाळींब, आंबा, केळी, ढोबळी मिरची पिकांचे जवळपास ९५ हेक्टर क्षेत्र नुकसानग्रस्त झाले. सदरील नुकसानग्रस्त भागाचे तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी तालुका प्रशासनास दिले. रविवारी कर्जत तालुक्यातील १० महसुली मंडळात झालेला पाऊस पुढीलप्रमाणे : कर्जत -३२.३ मिमी, राशीन - ११ मिमी, भांबोरा- २७.८ मिमी, कोंभळी - १६ मिमी, वालवड - २६.५ मिमी, कोरेगाव - २१.५ मिमी, कुळधरण - ६.३ मिमी, माही - ५.५ मिमी तर मिरजगाव आणि खेड महसुली मंडळात पावसाची नोंद झाली नाही.

---

# धर्मस्थाने उभी करणे सोपी गोष्ट नाही : डॉ.नामदेव शास्त्री

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** धर्मस्थाने उभी करणे सोपी गोष्ट नाही. कष्टकऱ्यांच्या योगदानाच्या जोरावर येळेश्वर संस्थांचे मठाधिपती रामगिरी महाराजांनी अशक्यप्राय गोष्ट शक्य करून दाखवली. धन, कण, व क्षण गोळा करत स्वतःला मोठे न समजता जमिनीवर राहून गगणाला गवसणी घालण्याची रामगिरी महाराजांची



वाटचाल कौतुकास्पद असून सर्व शक्तीनिशी भगवानगड येळेश्वर संस्थांच्या पाठीशी आहे. अशा शब्दात भगवान गडाचे महंत न्यायाचार्य डॉ.नामदेव शास्त्री यांनी येळेश्वर संस्थांचे मठाधिपती रामगिरी महाराज यांच्या कार्याचे कौतुक केले.

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे येळेश्वर संस्थानच्या वतीने अधिक मास निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता व नव्याने बांधण्यात आलेल्या तेथील भव्य मठाच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. गेले आठ दिवस येळी पंचक्रोशीतील व राज्यातील सुमारे ६५ गावातील हजारो भाविकांच्या उपस्थितीने सर्वच भाविकांना आषाढी सोहळ्याची आठवण झाली. शनिवारी सकाळी टाळ मृदंगाच्या गजरात अत्यंत प्रेक्षणीय अशी ग्रामप्रदक्षिणा संपन्न झाली. प्रदक्षिणा मार्गावर भाविकांसह ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे पुष्पवृष्टी केली. भगवान गडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री यांच्या सहभागाने संपूर्ण वातावरण चैतन्यमय बनले. लोकसहभागातून लाखो रुपये खर्चून तीन मजली भव्य असा मठ रामगिरी महाराजांच्या पुढाकारातून पूर्ण झाला. आगामी काळात आळंदी येथेही मठ बांधण्याचा संकल्प येळी व परिसरातील गावांच्या भाविकांनी केला आहे. ग्राम प्रदक्षिणा सोहळ्या दरम्यान भाविक वारकऱ्यांनी चंद्रभागा नदीच्या वाळवंटात सादर केलेले उभे व गोल रिंगण सुद्धा डोळ्याचे पारणे फेडणारे ठरले. वारकऱ्यांची शिस्त व तल्लीनता खऱ्या उपासकांचे दर्शन देणारी ठरली. अधिक मासानिमित्त सोहळ्याचे यंदाचे रौप्य महोत्सवी वर्ष असून यापूर्वी काशी, पैठण, त्र्यंबकेश्वर, आळंदी, देहू, अशा विविध तीर्थक्षेत्री सप्ताह संपन्न झाला. काल्याच्या कीर्तना सह सांगता समारंभाला तालुक्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थिती दर्शविली. अत्यंत भक्तिमय वातावरणात सप्ताह संपन्न झाला. यावेळी बोलताना डॉ. नामदेव शास्त्री म्हणाले, कुठलाही आधार नसताना मान अपमान सहन करत, जीवनाचा अमूल्य वेळ खर्च करत व स्वकर्तुत्वावर भाविकांसाठी सेवा कार्य करणे सोपी गोष्ट नाही.

---

# बेलवंडी परिसरात फुलचंद पान व हुक्क्याचा कहर!

## अल्पवयीन मुलांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

दादा सोनवणे | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** बेलवंडी परिसरात फुलचंद पान आणि हुक्क्याच्या वाढत्या विक्रीमुळे अल्पवयीन मुलांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर बेलवंडी व्यापारी पतसंस्थेचे चेअरमन उत्तम डाके यांनी संबंधित पानटपऱ्या व दुकानदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

परिसरातील काही पानटपऱ्यांवर शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सहजपणे फुलचंद पान व इतर नशायुक्त पदार्थ विकले जात आहे. त्यामुळे तरुण पिढी



व्यसनाच्या गर्तेत ओढली जात असून त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

उत्तम डाके यांनी सांगितले कि, दहावीत शिकणारा एक विद्यार्थी चक्कर येऊन पडल्याची घटना घडली. त्यानंतर संबंधित मुलाकडे चौकशी केली असता

> आरोग्य तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारच्या पान मसाल्यामध्ये निकोटीन, तंबाखूजन्य घटक, कृत्रिम स्वादद्रव्ये व इतर रासायनिक पदार्थ असण्याची शक्यता असते. या घटकांमुळे चक्कर येणे, मळमळ, हृदयाचे ठोके वाढणे, व्यसनाधीनता निर्माण होणे तसेच दीर्घकाळ सेवन केल्यास तोंड व घशाच्या आजारांचा धोका वाढू शकतो.

त्याने फुलचंद पान खाल्ल्याची माहिती दिली. या घटनेमुळे अशा पदार्थांच्या सेवनामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

उत्तम डाके यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाने या पदार्थांची तपासणी करून त्यामध्ये कोणते घटक वापरले जातात याचा शोध घ्यावा, तसेच बेलवंडी पोलिसांनी परिसरातील पानटपऱ्यांवर विशेष मोहीम राबवून अल्पवयीन मुलांना नशायुक्त पदार्थ विकणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

अल्पवयीन मुलांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या अशा व्यवसायांवर तातडीने कारवाई झाली पाहिजे. प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात येईल, असा इशारा उत्तम डाके यांनी दिला आहे.

---

# लोणी व्यंकनाथ मध्ये सेवानिवृत्त भूमिपुत्रांचा सन्मान सोहळा वातावरणात संपन्न



**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील धार्मिक व सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या लोणी व्यंकनाथ येथे १ जूनला गावातील देशी सेवा, शासकीय, निम शासकीय व विविध क्षेत्रात सेवा करून सेवानिवृत्त झालेल्या गुणवंत कर्मचारी तसेच १ जूनला ज्या युवक व ग्रामस्थांचा वाढदिवस आहे, अशा मान्यवरांचा सन्मान सोहळा उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.

रवींद्र चव्हाण व भरत काकडे या मित्र मंडळाच्यावतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा आयोजित केला. याप्रसंगी या मित्र मंडळाने सेवानिवृत्त बांधवांनी आठवण म्हणून आंब्याचे झाड लावून निसर्गाचा समतोल राखावा हा प्रेमाचा संदेश असल्याचे रवींद्र चव्हाण यांनी सांगितले. याप्रसंगी सरपंच मनीषा नहाटा, उपसरपंच चित्रा पवार, गणपत काकडे, बाळासाहेब थोरात, डी.आर. आबा काकडे, लाला काकडे, ॲड. बाळासाहेब काकडे, एन. टी. शेलार, भगवान गोरखे, संतोष भोसले, ह.भ.प. भरत काकडे, रविंद्र चव्हाण, रामदास साळवे आदींसह अनेक मान्यवरांनी या उपक्रमाचे स्वागत केले. यावेळी गावातील पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, युवक उपस्थित होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
मंगळवार दि.२ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## विवाहितेला मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : नेवासा तालुक्यातील चांदा येथे एका विवाहित महिलेला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून महिलांवरील अत्याचाराच्या घटनांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जोडमोहज येथील २५ वर्षीय विवाहित महिलेने १ जून रोजी सोनई पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. फिर्यादी महिला माहेरी वास्तव्यास असताना संबंधित आरोपी तिला सासरी नांदण्यासाठी येण्याबाबत सांगत होते. यावेळी महिलेने सासरी योग्य वागणूक मिळत नसल्याचे सांगितले. तसेच यापूर्वी झालेल्या मारहाणीमुळे पोटातील बाळाचा मृत्यू होऊन गर्भपात झाल्याचा आरोपही तिने केला. फिर्यादीनुसार, या बोलण्याचा राग आल्याने आरोपींनी महिलेला लाकडी दांड्याने मारहाण केली. तसेच अमोल बाबासाहेब गोरे याने, तू नांदण्यासाठी आली नाहीस तर मी औषध पिऊन आत्महत्या करीन आणि तुम्हा सर्वांना त्यात अडकवीन. तसेच तुला जीवे ठार मारीन, अशी धमकी दिल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी सोनई पोलिसांनी अमोल बाबासाहेब गोरे (रा. जोडमोहज), अशोक भाऊसाहेब दहातोंडे व रोहिणी अशोक दहातोंडे (दोघे रा. चांदा) यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक २५२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), ३३३ व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.घटनेचा पुढील तपास सोनई पोलीस करीत आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या स्मारकाने पुणतांब्याच्या ऐतिहासिक वैभवात भर : आ. आशुतोष काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : लोककल्याणकारी राज्यकारभाराचे आदर्श प्रतीक असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी पुणतांबा परिसरासह महाराष्ट्रात शेकडो मंदिरांची उभारणी केली असून विहीर, बारव आणि गोदावरी नदीवर घाट बांधले आहेत. दक्षिण काशी म्हणून पुणतांबा गावाची महाराष्ट्रात वेगळी ओळख असून राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या स्मारकाच्या उभारणीतून पुणतांब्याच्या ऐतिहासिक वैभवात अधिकची भर पडणार असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी म्हटले आहे. प्रजाहितदक्ष पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्ताने पुणतांबा गावच्या पावन भूमीत लोकसहभागातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या भव्य



स्मारकाचे भूमिपूजन अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते व आमदार आशुतोष काळे यांच्या उपस्थितीत रविवार (दि.३१) रोजी पार पडले यावेळी ते बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना आ.आशुतोष काळे यांनी सांगितले कि, अध्यात्म, संस्कृती, संघर्ष आणि इतिहास यांचा संगम पुणतांब्याच्या पवित्र भूमीत पाहायला मिळतो. अनेक नव्या क्रांतीची सुरुवात या गावातून झाली असून २०१७ रोजी झालेले राज्यव्यापी शेतकरी आंदोलन त्याचे उत्तम उदाहरण आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी पुणतांबा भूमीत उभारलेली शेकडो मंदिरे आणि गोदावरी नदीवरील घाटाचे संवर्धन करण्यासाठी जवळपास ३.५ कोटीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

> मागील महिन्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्ताने गोदा ते नर्मदा जल यात्रेचे नियोजन करण्यात येवून ही यात्रा यशस्वी झाली आहे. याच यात्रेला अनुसरून पुणतांबा येथील अहिल्यादेवींनी बांधलेल्या घाटाचे संवर्धन करण्यात येणार आहे. पुणतांबा ग्रामस्थांच्या पुढाकारातून पुणतांब्याच्या पवित्र भूमीतील अहिल्यादेवींचा इतिहास जपण्याचे कार्य होत असल्याचा मनस्वी आनंद होत आहे.या ऐतिहासिक घाटाच्या संवर्धनासाठी आमदार आशुतोष काळे यांनी केलेल्या मागणीनुसार निधी कमी पडू देणार नाही.
> **ना.राधाकृष्ण विखे**

यामध्ये अहिल्याघाटाच्या २६ भव्य दगडी पायऱ्या, आकर्षक गोलाकार बुरूज, प्राचीन महादेव मंदिर, कार्तिकस्वामी मंदिर आणि संत चांगदेव महाराज समाधी परिसर यांसारखी महत्त्वाची धार्मिक व पवित्र स्थळे आणि ऐतिहासिक गोष्टींचे संवर्धन करून भाविक, अभ्यासक आणि पर्यटक यांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेब निधी उपलब्ध करून देणार आहे. त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुणतांबा गावातील इतिहासाचे संवर्धन होणार आहे. तसेच नदी संवर्धन योजनेच्या अंतर्गत ११ कोटींच्या कामांचा प्रस्ताव पर्यावरण मंत्रालयाकडे सादर केलेला आहे. हे दोन्ही प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करण्यासाठी आपण सहकार्य करावे असे साकडे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना घातले.

यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे, आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते अधिक मासानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी घाटावर सामूहिक गंगा आरती करण्यात आली. मंत्रोच्चार, दीपप्रज्वलन आणि हरिनामाच्या गजरात झालेल्या या गंगा आरतीने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

यावेळी गौतम सहकारी बँकेचे माजी चेअरमन बाबासाहेब कोते, माजी सरपंच मुरलीधर थोरात, डॉ.धनंजय धनवटे, मा.जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र लहारे, वैजयंती धनवटे, संध्या थोरात, शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष धनंजय जाधव, आण्णासाहेब कोते, संदिप लहारे, दिलीप चौधरी, जळगावचे सरपंच शिवाजीराव साबदे, शामसुंदर धनवटे, नानासाहेब काळवाघे, भाऊसाहेब जाधव, दत्तात्रय धनवटे, विजय धनवटे, चांगदेव धनवटे, मच्छिन्द्र चौधरी, बबनराव बरवंट, महेश औताडे, संगिता भोरकडे, शांतीलाल भाटी, राहुल धनवटे, दिनेश जगताप, आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक समितीचे पदाधिकारी, महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, पुणतांबा ग्रामस्थ तसेच मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## खून करुन पळालेले दोन आरोपी नेवासा पोलीसांकडुन जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : छत्रपती संभाजीनगरमध्ये एका व्यक्तीची हत्या करुन पसार झालेले आरोपी नेवासा पोलीसांकडुन जेरबंद करण्यात आले असल्याची माहिती पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी दिली.सदर व्यक्तींवर सिडको पोलीस स्टेशन जिल्हा छत्रपती संभाजीनगर गु.र.नं. ३५५/२०२६ भा. न्याय संहिता कलम १०३(१) प्रमाणे दिनांक ३० मे २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.



सदर गुन्हयातील आरोपींनी छत्रपती संभाजीनगर मध्ये एका व्यक्तीची हत्या करुन ते घटनास्थळावरुन पसार झाले होते. याबाबत नेवासा पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी की सदर आरोपीपैकी दोन मुख्य आरोपी हे नेवासा पोलीस स्टेशन हद्दीत आल्याची गोपनीय माहिती नेवासा पोलीसांना मिळाली. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी पोलीस पथक तयार करुन आरोपी शोध कामी रवाना केले. सदर पथकातील पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील,पो.कॉ. संतोष शिंदे,पोकॉ नारायण डमाळे,पो.कॉ.अतुल शेळके, पो.कॉ.भारत बोडखे, महिला पोलीस कॉन्स्टेबल वर्षा कांबळे यांनी नमुद गुन्ह्यातील आरोपी प्रसन्नजित प्रमोद हिवाळे वय २० वर्ष, रा. मुकुंदवाडी सिडको एन-२ छत्रपती संभाजीनगर व अरुण पदमसिंग भुल वय १९ वर्ष, रा.एन -७ ओम प्राथमिक शाळा, छत्रपती संभाजीनगर यांना ताब्यात घेवुन नेवासा पोलीस स्टेशन येथे आणले व सदर ताब्यात घेतलेल्या आरोपींना सिडको पोलीस स्टेशन जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांच्या ताब्यात देण्यात येणार आहे.

पुढील तपास सिडको पोलीस स्टेशन जिल्हा छत्रपती संभाजीनगर हे करीत आहेत. सदरची कारवाई अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन,अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे,वैभव कलुबर्मे,शेवगाव विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांनी दिलेल्या मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे नेवासा पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक सागर ढिकले, पो. उपनिरीक्षक विकास पाटील, पोकॉ/संतोष शिंदे, पोकॉ/नारायण डमाळे, पोकॉ/अतुल शेळके, पोकॉ/भारत बोडखे, मपोकों/वर्षा कांबळे यांनी केली आहे.

## स्व. गोविंदरावआदिक पुण्यतिथीनिमित्त आरोग्य शिबिर ; ८ रुग्णांची ॲन्जिओग्राफी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : महाराष्ट्र कृषक समाज आणि साखर कामगार हॉस्पिटल ट्रस्ट श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय खासदार गोविंदराव आदिक यांच्या पुण्यतिथी निमित्ताने आयोजित हृदयविकार व रक्तदाब तपासणी शिबिरात २८० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी आपली दक्षता विभागाचे लोकार्पण करीत ८ रुग्णांची अँजिओग्राफी ही करण्यात आली.




येथील साखर कामगार हॉस्पिटल मध्ये भरविण्यात आलेल्या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार)राष्ट्रीय प्रवक्ते श्री. अविनाश आदिक यांच्या हस्ते करण्यात आले. पुष्पलता ताई आदिक, साई संस्थानच्या माजी विश्वस्त आणि श्रीरामपूर नगरपालिकेच्या प्रथम महिला लोकनियुक्त नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक यावेळी उपस्थित होत्या.

प्रसिद्ध हृदयविकार तज्ञ डॉ. गौरव वर्मा यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सकाळच्या सत्रात भरविण्यात आलेल्या या शिबिरात मोफत टूडी इको सह हृदयविकार व रक्तदाब तपासणी करण्यात आली. आदिक म्हणाले, साखर कामगार हॉस्पिटल ची सेवा आणि दर्जा दिवसेंदिवस अधिक उंचावत आहे. सर्वांचे आरोग्य निरोगी रहावे, सर्वांना उदंड आयुष्य लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. इतर रुग्णालयांच्या तुलनेत साखर कामगार रुग्णालयात दरवर्षी काही ना काही नवनवीन पहायला मिळते, ही गौरवाची बाब आहे. आमच्या आदिक कुटुंबाला ही त्यात खरीचा वाटा मिळतो. साखर कामगार रुग्णालयाचे विश्वस्त कामगार नेते अविनाश आपटे, ज्ञानदेव पाटील आहेर आणि डॉक्टर रवींद्र जगधने यांचे नेहमीच सहकार्य मिळते, असे आदिक म्हणाले. शिबिरास आदिक कुटुंबीयांसह अर्चना पानसरे, डॉ. दिलीप पडघन, डॉ.गणेश जोशी, डॉ.अमित पांडे, बापूसाहेब सदाफळ, ड. जयंत चौधरी, सैफ शेख, आदित्य आदिक, अविनाश पोहेकर, अर्जुन आदिक, सुनील थोरात, रंजन वाव्हळ प्रसन्न शेटे, सुमित मुथा आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. दरम्यान, सदरचे शिबिर हे गेल्या अकरा वर्षापासून भरविण्यात येते. त्याचा सर्वसामान्य रुग्णांना मोठ्या प्रमाणात लाभ होतो.जनसेवा हीच ईश्वर सेवा आहे.आदिक कुटुंबियांकडून जनतेची सेवा केली जात आहे.

## विधान परिषदेसाठी महायुतीचे उमेदवार प्राजक्त तनपुरे यांचा अर्ज दाखल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी नगर पाथर्डी विधानसभेतील निवडणुकीत केंद्रबिंदू ठरलेले माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांनी नुकताच भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर भाजपकडून त्यांना विधानपरिषदेसाठी उमेदवारी देण्यात आली. त्यानुसार अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे काल सोमवारी प्राजक्त तनपूरे यांनी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत राजकिय शक्ती प्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.



माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांनी विधानसभेच्या पोट निवडणुकीत भाजपाचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या विरोधात उमेदवारी न केल्यामुळे तनपूरे यांनी विधानपरिषदे च्या निवडणुकी पूर्वी भाजपमध्ये अधिकृत प्रवेश केला. त्यानंतर माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांना भाजपाने अहिल्यानगर ची विधानपरिषदेच्या जागेसाठी त्यांची उमेदवारी निश्चित केली. जिल्ह्यात विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी इतरांच्या तुलनेत भाजपाच्या नगरसेवकांची संख्या जास्त असल्याने ही जागा भाजपाच्या वाटेला आली आहे. त्यामुळे माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

श्री तनपूरे यांनी विधानसभेच्या पोट निवडणुकीत दाखविलेला मनाचा मोठेपणा व राखलेला संयम म्हणूनच हे फळ त्यांना मिळाले आहे .तनपूरे यांनी काल दि. १ जून २०२६ रोजी सकाळी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, संगमनेरचे आमदार अमोल खताळ व आमदार काशिनाथ दाते आदिंच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी अनेकांची चर्चा होती परंतु शेवटच्या दिवशी प्राजक्त तनपुरे (भाजपा) यांच्या व्यतिरिक्त करण ससाने (अपक्ष) कमलेश गांधी (अपक्ष) दत्तात्रय पानसरे (अपक्ष) मच्छिंद्र धुमाळ (अपक्ष) यांचेही अर्ज दाखल झाले आहेत. भारतीय जनता पक्षाने महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी कंबर कसली असल्याने प्राजक्त तनपुरे यांचा विजय निश्चित होणार असल्याचे वरिष्ठांनी सांगितले आहे. या प्रसंगी महायुतीचे अनेक नेते व भाजपाचे व राहुरी तालुक्यातील बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## चोऱ्यांचा ड्रोनशी कुठलाही संबध नाही : पो. नि. देशमुख

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : रात्रीच्या वेळेस आकाशात फिरणारे ड्रोन व चोरांच्या उठणाऱ्या अफवा यांचा कुठलाही संबंध नसून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नका,येत्या ३-४ दिवसात पोलिसाकडून ड्रोन पाडण्यासंदर्भात कार्यवाही केली जाईल, या संशयास्पद गोष्टी आढळल्यास पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा असे आवाहन पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी केले. श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर येथे रात्रीच्या वेळेस आकाशात फिरणारे ड्रोन मुळे नागरिकात वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. यावेळी पोलीस निरीक्षक देशमुख यांनी परिसरातील नागरिकांची बेलापूर पोलीस चौकीत विशेष बैठक बोलविण्यात आली. काही सुचना पोलिस प्रशासनाकडून देण्यात आल्या. याच विषयावर बेलापूर ग्रामसभेतही चर्चा झाली होती. त्यावेळी बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे यांनी पोलीसांनी तातडीने ड्रोनबाबत नागरिकांना खुलासा करावा, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. यावेळी संजय गांधी निराधार कमीटीचे अध्यक्ष शरद नवले,अभिषेक खंडागळे, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले मराठा महासंघाचे तालुकाध्यक्ष दिलीप थोरात अल्ताफ शेख सचिन वाघ, पोलीस पाटील शिवाजी भोसले, विष्णुपंत डावरे आदिंची मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी प्रवासी संघटनेचे रणजित श्रीगोड, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस अरुण नाईक, बाळासाहेब दाणी, विलास थोरात, विशाल मेहेत्रे, विशाल आंबेकर, नागेश बाराहाते, अजिज शेख, गोपी दाणी, ऋतुराज वाघ, ऋषी मुंदडा, मोहसीन सय्यद, प्रशांत लड्डा, महेश थोरात, शिवाजी भोसले, पोलीस पाटील अशोक प्रधान, युवराज जोशी, उमेश पारधे, विशाल मेहेत्रे, रफिक शहा, अमोल राशिनकर, बाबुलाल पठाण, राज गुडे, नितीन शर्मा, रविंद्र मेहेत्रे, अरुण शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश जाधव, पोलीस कॉन्स्टेबल संपत बडे, पोलीस कॉ. आजीनाथ आंधळे, भारत तमनर, आदिसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# फडणवीस यांची दूरदृष्टी, विखेंकडून काँग्रेस खिळखिळी

## भाजप निष्ठावंतांवर मात्र हात चोळत बसण्याची वेळ

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नगर जिल्ह्यातील भाजप पाय रोवून उभी राहण्यासाठी दूरदृष्टी ठेवली आहे. अगोदर सत्यजित तांबे आणि आत्ता प्राजक्त तनपुरे यांना भाजपात स्थान देत आमदारकी ही बहाल केली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी जिल्ह्यातील काँग्रेस खिळखिळी केली आहे. काँग्रेस मधीलच नेत्यांना भाजपात घेऊन त्यांना संधी देत असताना निष्ठावंत भाजप नेते आणि पुढारी तसेच कार्यकर्त्यांवर मात्र हात चोळत बसण्याची वाईट वेळ आली आहे. फडवणीस यांनी दूरदृष्टी ठेवत जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात भाजप नंबर वन करण्याचे धोरण अवलंबिले आहे त्यात ते यशस्वीही होत आहेत मात्र जुन्या निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांची अवस्था एखाद्या घाटात संध्याकाळ व्हावी , असा प्रकार मानला जात आहे.

काँग्रेस च्या काळात तळागाळातील आणि किरकोळ समजल्या जाणाऱ्या कार्यकर्त्यांनीच भाजपाचा झेंडा कधीही सोडला नाही. कोणत्याही नेतृत्वाची वाट न बघता राज्यात जिल्ह्यात याच कार्यकर्त्यांनी एकला चलो रे च्या भूमिकेत पक्षासाठी झिजत मोठा त्याग केला. आज नाही तर उद्या आणि उद्या नाही तर परवा, आपल्या पारड्यात भाजप नेतृत्व काहीतरी दान टाकील या इच्छा आकांक्षाने जुने निष्ठावंत भाजप नेते, पुढारी आणि कार्यकर्ते आजही आशाळभूत नजरेने एक एक दिवस कंठीत आहेत. मात्र निघणारा दिवस हा मागच्या सारखाच कोरडा निघत असल्यामुळे जुन्या निष्ठावंत भाजप कार्यकर्त्यांवर हात चोळीत बसण्याची वेळ आली आहे. याबाबत या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष धगधगत आहे. ' याचसाठी केला होता का तो अट्टाहास ' अशी म्हणण्याची वेळ या कार्यकर्त्यांवर आली आहे.

भाजप हायकमांड वर कार्यकर्ते जाहीररीत्या बोलत नसले तरी त्यांची अंतर्गत खदखद मात्र स्थानिक पातळीवर प्रत्येकाशी संवादातून स्पष्ट जाणवत आहे. भाजपाला सत्तेत देऊन अडीच तीन वर्षाचा कालावधी लोटला आहे. राज्यासह जिल्ह्यात भाजप अव्वल स्थानावर आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस योग्य व्हू रचना आखून ती यशस्वी ही करीत आहेत मात्र भाजपामध्ये आयात करण्यात येणारे नेते सर्वच काँग्रेसचे आहेत. त्यांना संधी मिळत असेल तर आमचे काय आणि किती दिवस थांबायचे असाही सवाल काही कार्यकर्ते खाजगीत व्यक्त करीत आहे. वर्षानुवर्षापासून हेच काँग्रेसचे पुढारी काँग्रेसची सत्ता असताना सत्तेत होते.

आताही भाजप सत्तेत असताना तेच सत्तेत आहेत. स्थानिक पातळीवर ज्या भाजपाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी भाजप सत्तेवर येण्यासाठी याच काँग्रेस नेतृत्वाशी दोन हात केले, संघर्ष केला अशा काँग्रेस नेतृत्वाशीच त्यांना जुळवून घेत दिवस मोजावे लागत आहेत. याबाबत त्यांनी भाजप नेतृत्वाबाबत निराशा व्यक्त केली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी देखील यात मोठी उडी घेतली आहे. नगर जिल्ह्यात काँग्रेस खिळखिळी करण्याचा त्यांनी विडा उचलला आहे.

मुख्यमंत्री फडवणीस यांनी जिल्ह्यातील भाजप मजबूत करण्याचे कार्य विखे यांच्या हाती सोपविले आहे. विखे यांचे सर्वच कार्यकर्ते आजपर्यंत विखे हाच पक्ष मानतात. विखे काँग्रेसमध्ये असताना देखील त्यांनी जिल्ह्यात आपली पकड मजबूत ठेवली होती. त्यानंतर ते शिवसेनेत गेले तेथेही ती ढीली होऊ दिली नाही. सध्या देखील भाजपामध्ये त्यांनी मुख्यमंत्री फडवणीस यांचा मोठा विश्वास संपादन करून जिल्ह्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि जमेल तसे इतर पक्ष आणि नेत्यांना भाजपामध्ये विलीन करण्याचा सपाटा लावला आहे. विखे यांच्या या भूमिकेमुळे मात्र सर्वच घायाळ झाले आहेत. भाजपामध्ये देखील जिल्ह्यात विखेंचा वरचष्मा राहिलेला आहे. भाजपामधील जुन्या जाणत्या निष्ठावंतांना त्यांनी पूर्वीच घरचा रस्ता दाखविला आहे. तेथे स्वतःची टीम उभे करून भाजपा मजबूत करण्याचे त्यांचे धोरण यशस्वी ही झाले आहे. जिल्ह्यात यापूर्वी विखेंच्या विरोधात भाजपा अंतर्गत मोठा आक्रोश आणि असंतोष होता. मात्र अलीकडे मुख्यमंत्री फडवणीस यांच्या दूरदृष्टीमुळे जिल्ह्यातील भाजपामध्ये विखें बद्दल असलेला राग काही अपवाद वगळता कमी झाला आहे. विवेक कोल्हे यांना फडवणीस यांनी आमदारकी देत जिल्ह्यातील भाजपा अंतर्गत असंतोष कमी केला आहे. एकटे राम शिंदे सोडल्यास जिल्ह्यात आज तरी निष्ठावंत कार्यकर्ता भाजपामध्ये कोणीच नाही. भाजपा ची सत्ता यावी यासाठी ज्यांनी खस्ता खाल्लयात




अशांवर मात्र सध्या दातातील पाणी गिळत बसण्याची वेळ आली आहे.

काँग्रेस जणांना भाजपात घेऊन त्यांना मोठमोठी पदे देण्यात येत असताना जुने निष्ठावंत भाजप नेते आणि कार्यकर्ते मात्र विजनवासात आपले दिवस मोजत आहेत.